
Aalochana

पुस्तक



# ... वाटचाल

एका लोकचळवळीची
नर्मदा खोऱ्यातील पंधरा वर्षाची
नर्मदा बचाव आंदोलनाची





A235
संग्रह
2286



Aalochana

# ... वाटचाल

एका लोकचळवळीची

नर्मदा खोऱ्यातील पंधरा वर्षाची

नर्मदा बचाव आंदोलनाची

Aalochana
Centre for Doc. & Res. on Women
86/11-B Kedar, Kanchan Galli,
Erendwana, Pune-411 004

4.12.00
28/11/07

A235
संगवई
2286

प्रकाशक

नर्मदा सपोर्ट ग्रुप

S-87, भरतनगर, नागपूर - ४४०००१

Ph.: 547438

ऑगष्ट २०००

लेखक

संजय संगवई

टाईपसेटींग

वेधपूर्ति कॉम्प्युटर्स

नवी शुक्रवारी, नागपूर - ४४०००२

निर्मिती सहयोग

National Council of Churches in India
Urban Rural Mission

वन कामगार संघटना, नागपूर

Rainbow Greeners Nagpur
प्रोप्रा. मनोज टावरी

देणगी मूल्य - १० रू.

# पुस्तकाविषयी ......

नुकताच आपण ५३ वा स्वातंत्र्यदिवस, १५ ऑगस्ट २००० ला साजरा केला. या सहस्त्रकातला, आणि शतकातला शेवटचा स्वातंत्र्यदिवस. त्याच दिवशी, त्याच वेळी नर्मदा खोऱ्यात मध्यप्रदेश व महाराष्ट्राच्या सीमेवर डोमखेडी व जलसिंधी येथे १५ वर्षापासून सुरू असलेल्या नर्मदा बचाओ आंदोलनाचा एक भाग म्हणून १५ जुलै ते १५ ऑगस्ट पर्यंत चाललेल्या एका महिन्याच्या सत्याग्रहाचा सांगता समारंभ झाला.

१९९५ साली नर्मदा बचाओ आंदोलनाने सुप्रीम कोर्टामध्ये दाखल केलेल्या याचिकेची अंतिम सुनावणी होऊ घातली आहे. ज्या सुप्रिम कोर्टाने धरणाच्या बांधकामावर ९५ मध्ये 'स्थगिती' दिला, त्यांनीच ९९ मध्ये धरणाचे बांधकाम करण्याची परवानगी दिली. त्यामुळे ऑगस्ट, सप्टेंबर ९९ मध्ये हजारो लोकांची घरे पाण्याखाली आली. ' डुबेंगे पर, हटेंगे नहीं ' नारा देऊन लढत राहिले हे आपण जाणता आहातच. आजही तशीच परिस्थिती आहे व त्यात सुप्रीम कोर्टाची अंतिम सुनावणीमुळे आंदोलन एका टप्प्यावर पोहचले आहे. आजपर्यंतचा टप्पा आपल्या मदतीने, सहभागाने गाठला. पुढचा टप्पाही आपल्या मदतीने आणि सहभागाने गाठायचा आहे. आपल्या सहभागाने आतापर्यंतची वाटचाल कशी झाली याचा थोडक्यात वृत्तांत ह्या छोट्याशा पुस्तकरूपाने आम्ही आपल्यापुढे ठेवत आहोत.

विस्तृत माहितीसाठी नुकतेच इंग्रजीत प्रकाशित झालेले संजय संघवई यांनी लिहीलेले The River and Life हे पुस्तक ज्यांना शक्य आहे त्यांनी वाचावे, त्यामुळे आपला विचार जास्त समर्थ होईल.

पुढील सहभागाच्या प्रतिक्षेत.

कॉ. चंद्रा विलास भोंगाडे ॲड. शिरीष गाडगे मोहन कोठेकर
नर्मदा सपोर्ट ग्रुप, नागपूर

# त्याग आमूपे काय मांगता ?

देश भक्त लोग तुमूरा
त्याग आमूपे काय मांगता ॥धृ॥

जंगल आमा याहाकी हाये
रक्षण में जीवे जाये
झाडे तुमा तोडी टाकता ॥

मांडू नाहा पायी नाहा
डोवमां आमा आसू नाहा
तुमा खातर धरणे बांधता ॥

झोपडी मा दिवो नाहा
उजड आमा गावमा नाहा ।
डोळा देखता उजड चोरता ॥

लढ्या आमू देशाखातर
इतिहास मा नावे नाहा ।
राजगादी पर तुमू बोहता ॥

आमू तुमा साकरी कियी
आमा खातर मांडू नाहा ।
मांडा उपे तवा मांगता ॥

पचास वरषे मते दे दा
संसद मा आमा नाहा ।
मते आमा काय मांगता ॥

# १. आह्वान व आवाहन

नर्मदा खोऱ्यात १९८६ पासून सरदार सरोवराच्या विरोधात चालू असलेला जनसंघर्ष हा स्वातंत्र्योत्तर भारतामधील प्रमुख जनआंदोलनांतील एक महत्वाचा टप्पा आहे. या चळवळीमुळे विस्थापनाचा प्रश्न, विस्थापितांचे अधिकार, विकास प्रकल्पांची योग्य-अयोग्यता, लाभ-हानी, सामाजिक न्याय या मुद्यांवर विचारमंथन घडून आले. त्याचबरोबर आजवरचे विकास प्रकल्प त्यामागील धोरणे (विकास नीती) व विकासाची संकल्पना यांची चिकित्सा सुरू झाली. त्याचबरोबर विकास कसा हवा ? याबाबत विविध स्तरावरून मांडणीही सुरू झाली.

नर्मदा खोऱ्यात आहेत

**तीस मोठी धरणे**

**एकशे पस्तीस मध्यम धरणे**

**तीन हजार लहान धरणे**

सरदार सरोवर आणि इंदिरा सागर हे यामधले सर्वांत मोठे, त्यापैकी सरदार सरोवरला खर्च येतो आहे. आजच्या परिस्थितीत ५०,००० कोटी. जर वरील सर्व धरणे झाली तर खर्च, विस्थापन, याचा आपल्याला अंदाज येईल.

सरदार सरोवर प्रकल्पाची वास्तव स्थिती व नर्मदा बचाओ आंदोलन यांची थोडक्यात ओळख करून देण्याचा हा प्रयत्न आहे. मात्र याही पलिकडे जाऊन आपण आपल्या आसपासच्या तथाकथित विकास प्रक्रियेकडे डोळसपणे व चिकित्सक दृष्टीने पाहणे व अधिक समतावादी, न्याय्य व पर्यावरणीय दृष्ट्या टिकाऊ पर्यायांचा शोध घेणे आवश्यक आहे. नर्मदा खोऱ्यातील लढ्याचे हेच आह्वान व आवाहन आहे.

# थोडक्यात सरदार सरोवर प्रकल्प

## (तांत्रिक माहिती)

| | |
|---|---|
| स्थान | नवागाम, तालुका नानडोड, जि. भरूच (गुजराथ) |
| अंक्षाश | २१.५० अंश उत्तर |
| रेखांश | ७३.४५ अंश उत्तर |
| जलग्रहण क्षेत्र (Cachment area) | ८८,००० चौ. कि.मी. |
| धरणाची लांबी | २१४ कि.मी. |
| जास्तीत जास्त धरणाची रुंदी | १६.१ कि.मी. |
| धरणाची सरासरी रुंदी | १.७७ कि.मी. |
| डुबीत क्षेत्र (Submerge area) | ३७,००० हेक्टर |
| निश्चित केलेली जास्तीत जास्त पाण्याची पातळी (FRL) | १३८ मीटर (४५५ फूट) |
| उच्चतम पाण्याची पातळी | ४६० फूट |
| नदीची पातळी | १८ मी. एमएसएल |
| सांडवा (वक्राकार लोखंडी द्वार) ६०' X ५५' | २३ दारे |
| ६०' X ६०' | ७ दारे |
| नदीच्या पात्रातील क्रांक्रीट मुख्य भिंतीची लांबी | १२१० मीटर |
| धरणाची उंची | ४८०.६ फूट |
| उपयोगासाठी उपलब्ध असलेल्या पाण्याची साठवणूक क्षमता | ४.७ मिलीयन एकर फूट |
| मुख्य कॅनालची लांबी | ४६० कि.मी. |
| कॅनाल शिर्षपातळी (FSL) | ९१.४४ मी. (३०० फूट) |

| | |
|---|---|
| कॅनालची रुंदी (धरणाच्या जवळ) | ७३.१ मी |
| कॅनालची खोली (धरणाच्या जवळ) | ७.६ मी. |
| कॅनाल जलनिस्सारण क्षमता | ४०,००० क्युसेस |
| कॅनालच्या एकूण शाखा | ४२ |
| पाणी वितरणाचे जाळे | ७५,००० किमी. |
| धरणाची एकूण पाणी साठवण्याची क्षमता | ०.९५ मे. हे. मी. (7 MAF) |
| एकूण बुडीत क्षेत्र | ३७,६९० हे. |
| उपजाऊ शेती (Agriculture Land) | ११,२७९ हे. |
| जंगल जमीन | १३,५४२ हे. |
| नदी आणि पडीत जमीन | १२,८६९ हे. |
| एकूण बुडीत गावे | २४५ |
| मध्यप्रदेश : १९३ | |
| महाराष्ट्र : ३३ | |
| गुजरात : १९ | |
| वार्षिक सिंचन क्षमता | ~~२०.९२~~ १८.४५ लाख हे. |
| गुजरातमध्ये १७.९२ लाख हेक्टर | |
| राजस्थानमध्ये ७३,००० हेक्टर | |
| एकूण विद्युत निर्मिती (स्थापित क्षमता) | १४५० मेगॉवॅट |
| नदीवरील विद्युत केंद्र १२०० मेगॉवॅट | |
| कॅनालवरील विद्युत केंद्र २५० मेगॉवॅट | |
| पिण्याचे पाणी | ८२१५ खेडी, १३५ ~~८२२५~~ शहरी केंद्र |
| पूर नियंत्रण | ३०,००० हेक्टर जमीन भरूच शहरासहित २१० खेडी |


## धरणाची किंमत

वेगवेगळ्या वेळी प्रत्येक संस्थांनी सरदार सरोवरांची काढलेली किंमत.

| | |
|---|---|
| रू. ४८८७ करोड | टाटा इकॉनॉमिक कन्सलटन्सी सर्व्हिसेस, १९८३ |
| रू. १३,६४० करोड | जागतिक बँक, १९८५ |
| रू. ६४०६ करोड | योजना आयोग, १९८८ |
| रू. ११,१५४ करोड | सी.सी. पटेल ॲन्ड असोसिएट्स, १९९० |
| रू. ८,५७५ करोड | फक्त गुजरातचा वाटा, "फॅक्टस्", १९९० |
| रू. ९,००० करोड<br>रू. १०,००० करोड<br>रू. ११,००० करोड | प्रत्येक वेळी SSNNL द्वारा |
| रू. ३४,००० करोड | वल्ड बॅंकेच्या अभ्यासाच्या आधारे काढलेला अंदाज, १९९४ |
| रु. १३,२०० करोड | "फॅक्टस्" १९९१-९२ च्या मूल्यावर, १९९५ |
| रू. २०,२२५ करोड | सरदार पटेल संस्था, गुजरात, १९९५ |
| रू. २५,००० करोड | नर्मदा विकास मंत्री, जयनारायण व्यास, १९९५ |
| रू. ५२,००० करोड | अमरसिंग चौधरी, माजी मुख्यमंत्री आणि विरोधी पक्ष नेता, १९९६ |

(१६.३.१९९६ ला संदेशमध्ये चौधरी यांनी दिलेल्या वक्तव्यावरून सरदार सरोवरांची किंमत ५२,००० करोडपेक्षाही आणखी १,००० करोड वाढू शकते.)

# सरदार सरोवराचे गुजरातमधील लाभक्षेत्र




सरदार सरोवरामुळे होणारे लाभक्षेत्र

ह्या ठिकाणी सध्या सिंचन होते आहे.

## २. दावे आणि वास्तव

✡ **या धरणासंबंधी सर्व अभ्यास पूर्ण झाले आहेत. सर्व मंजुऱ्या मिळाल्या आहेत. जागतिक बँकेनेही प्रकल्पाला मदत दिली होती.**

धरणाच्या महत्त्वाच्या अंगांसंबंधी सर्व अध्ययने, आयोजने आजवर अपूर्ण आहेत. केंद्रीय पर्यावरण विभागाने १९८७ मध्ये या धरणाला सशर्त मंजुरी दिली होती. त्यातही अनेक अध्ययने पूर्ण करण्याच्या अटी टाकल्या होत्या. या सर्व अटींचा भंग झाल्याने सप्टेंबर १९९० मध्ये, नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या (Narbada Control Authority) बैठकीत पर्यावरण विभागाने आपली मंजुरी रद्द केल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर त्याची नव्याने मंजुरी अद्याप घेतली वा मिळाली नाही.

पर्यावरण विभाग व जागतिक बँकेची निष्पक्ष समीक्षा समिती (मोर्सकमिटी) यांच्या अहवालात या धरणाचे महत्त्वाचे अध्ययन-आयोजन अपूर्ण असल्याचे पुन्हा स्पष्ट करण्यात आले. मोर्स समितीने (१९९२) या धरणातील लाभाचे मुद्दे चढवून सांगितले असून पुनर्वसन अशक्य असल्याचे व पर्यावरणीय, लाभ-हानी अभ्यास झाले नसल्याचे सांगितले. त्यावरून मार्च १९९३ मध्ये जागतिक बँकेने या प्रकल्पातून अंग काढून घेतले.

१९९५ मध्ये जागतिक बँकेच्या प्रकल्प पूर्तता अहवालामध्ये (Project Completion Report) या धरणाचे सिंचनाचे लाभ कालौघात १५ ते २० टक्यांनी कमी होतील असे म्हटले आहे. अर्थात जागतिक बँक व अन्य मदत संस्थांनी देखील प्रकल्पाच्या सर्व अंगांनी अभ्यास केला नव्हताच. १९९४ मध्ये केंद्र सरकारच्या पाच सदस्यीय तज्ज्ञ समितीनेही अनेक अभ्यास झाले नसल्याचे सूचित केले होते.

✡ **सरदार सरोवरामुळे गुजरातची १८ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. दुष्काळी कच्छ-सौराष्ट्र व उत्तर गुजरातसारख्या भागात शेतीला व पिण्याला पाणी मिळणार आहे.**

अन्नधान्याचे उत्पादन वाढणार आहे.

हे सर्वच दावे संशयास्पद आहेत.

मुळात नर्मदेतच अंदाजित केलेल्या पाण्याच्या प्रमाणापेक्षा कमी पाणी असल्याचे आता माहीत झाले आहे. धरणाचे व त्यातील ९ दशलक्ष एकर फूट (दएफू) पाण्याचे नियोजन हे नर्मदेत २८ दएफू पाणी असल्याच्या अंदाजावर आधारित होते. मात्र मध्यप्रदेशाच्या सरकारच्या अनंतरामन समितीने (१९८५) व जागतिक बँकेच्या निष्पक्ष समीक्षा समितीने (मोर्स कमिटी) नदीमध्ये २२ दएफू एवढेच पाणी असल्याचा सुधारित अंदाज व्यक्त केला. त्यानुसार धरणात अपेक्षेपेक्षा कमीच पाणी उपलब्ध असणार आहे.

सरदार सरोवराच्या वरच्या प्रवाहात नर्मदा सागर नावाचे आणखी एक धरण मध्य प्रदेशात बांधले जाणार आहे. सरदार सरोवरामधील अपेक्षित जलसाठ्याच्या अर्धे पाणी या नर्मदा सागरामधून टप्प्याटप्प्याने सोडले जाणार आहे. त्यासाठी नर्मदा सागर हे सरदार सरोवराच्या पूर्वी तयार व्हायला हवे. परंतु नर्मदा सागर धरणाखालीही हजारो हेक्टर जंगल व जमीन बुडणार असून २५४ गावे विस्थापित होणार आहेत. त्यामुळे तेच आज वादविवादांच्या भोवऱ्यात अडकले आहे. नर्मदा सागर न बांधले गेल्यास सरदार सरोवराच्या सिंचनाचे लाभ २५-३० टक्क्यांनी कमी होतील.

सरदार सरोवराच्या कालव्यांच्या सिंचनाची क्षमता ६०% असेल असे गृहीत धरून १८ लाख हेक्टरचे सिंचनाचे दावे करण्यात आले आहेत. मात्र भारतात काय व गुजरात मध्ये काय आजवरची कमाल सिंचन क्षमता ४०-४५ टक्के एवढीच आहे. म्हणून ६०% चा दावा अव्यवहार्य आहे. पाणीगळती (सीपेज), बाष्पीभवन या सर्वांचा हा परिणाम होय.

भारतातील आजवरच्या सर्व धरणांतील गाळांचे प्रमाण अंदाजापेक्षा कितीतरी पटीने अधिक वाढल्याचा केंद्रीय जल आयोगासहित सर्व अभ्यासांचा निष्कर्ष आहे. नर्मदेच्या जवळच्या तापीवरील उकई धरणातही अंदाजापेक्षा अधिक गाळ साठून त्याची क्षमता कमी झाली आहे.

उपलब्ध पाण्याचा मोठा भाग हा उसासारखी नगदी पिके घेण्यासाठी वापरला जाणार आहे. त्याची तयारीही सुरू झाली आहे. धरणाच्या लाभक्षेत्राच्या पहिल्याच टप्प्यात किंवा त्याच्या नजीक सुमारे २५ साखर कारखान्यांना परवाने देण्यात आले आहेत.

या सर्व मुद्यांचा विचार करता, सरदार सरोवरामुळे १८ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येऊ शकणार नाही हे स्पष्ट आहे.

प्रस्तावित लाभक्षेत्राचा अद्याप तपशीलवार अभ्यासच झाला नाही. कालव्याच्या प्रारंभीच्या क्षेत्राचा अभ्यास पूर्ण झाला आहे परंतु अन्य क्षेत्रांचा प्राथमिक अभ्यासच फक्त झाला आहे. त्यानुसार एकंदर लाभक्षेत्रातील ५० टक्के जमीन कालव्याच्या सिंचनास अनुकूल नाही. उलट सिंचनामुळे त्या जमिनींमध्ये दलदल माजण्याची शक्यता आहे.

सौराष्ट्र कच्छ सारख्या दुष्काळग्रस्त भागाला सरदार सरोवरापासून काही लाभ होणार नाही. कच्छच्या एकंदर लागवडयोग्य जमिनीच्या १.८% भागावर वर्ष २०२५ मध्ये तर सौराष्ट्राच्या ९.२४% भागावर २०२० मध्ये हे कालवे पोचतील. तेही सर्व काही यथास्थित झाले तरच.

या भागांना मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाणही कमी आहे. सरदार सरोवरातील एकूण पाण्याच्या फक्त दोन टक्के पाणी कच्छला मिळणार असल्याचे प्रस्तावित केले आहे. त्यातूनही प्रत्यक्षात त्याच्या मार्गावरील उसाचे मळे, साखरेचे कारखाने आणि बडोदा अहमदाबाद यासारखी शहरे, यांनी वापरल्यावर उरलेले पाणीच त्यांच्यापर्यंत पोहोचणार!

जागतिक बँकेच्या १९९५ च्या प्रकल्पपूर्ती अहवालात ( Project Completion Report प्रोजेक्ट कंप्लीशन रिपोर्ट) म्हटले आहे की सरदार सरोवराचे लाभक्षेत्र २०-२५% ने कमी करावे लागेल. आरंभी अंदाज केलेले सर्व लाभ मिळणार नाहीत. हे लाभक्षेत्र टोकाकडूनच कमी करत आणावे लागणार. म्हणजे यामध्ये पहिला बळी जाईल तो कच्छ-सौराष्ट्रचाच.

जे काही पाणी कच्छमध्ये जाईल ते मांडनी, गांधीधाम यासारख्या

शहरांना, तसेच उद्योगांना जाईल. शेतीला हे पाणी गेल्यास जमिनीतील क्षार वर येतील असे भूगर्भतज्ज्ञ डॉ. घारे (पुणे) यांचे म्हणणे आहे.

उन्हाळ्याच्या तीन महिन्यांत (एप्रिल ते जून) मही नदीच्या पलीकडे कालव्यात पाणी सोडणार नाही असे सरदार सरोवर नर्मदा निगमने १९८९ मध्येच स्पष्ट केले आहे.

एकेकाळी सरदार सरोवर धरणाला पाठिंबा देणाऱ्या कच्छच्या लोकांना व संघटनांना देखील या दाव्यांमधील फोलपणा कळला आहे. नर्मदा योजनेचा कच्छला लाभ नाही व कच्छला कमी पाणी देऊन झालेल्या अन्यायाचे निवारण करण्याची त्यांची सतत मागणी आहे. एप्रिल १९९९ मध्ये कच्छ जलसंकट निवारण समितीने गुजरात उच्च न्यायालयात यासंबंधी याचिका दाखल करून आपल्यावरील अन्यायाचे निवारण करण्याची मागणी केली आहे.

✡ **या धरणामुळे आठ हजारावर खेड्यांना व दुष्काळग्रस्त कच्छ-सौराष्ट्रातील सर्व खेड्यांना पिण्याचे पाणी मिळणार आहे.**

धरण बांधणारे सरदार सरोवर नर्मदा निगम फक्त कालव्यात पाणी उपलब्ध करून देणार आहे. ते पुरविण्याची जबाबदारी त्यांची नाही. ही जबाबदारी गुजरात जलनिःसारण मंडळाकडे आहे. मात्र आजवर या मंडळाने त्याबद्दलचा संपूर्ण आराखडा किंवा आर्थिक तरतूद केलेली नाही.

पिण्यासाठी व उद्योगांसाठी धरणाच्या पाण्यातील १.०६ दएफू पाणी राखून ठेवले आहे. त्यापैकी ०.८४ दएफू उद्योगासाठी असून हे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. अहमदाबाद, बडोदासारखी अनेक शहरे पाणी ओढणार आहेत, जे मूळ योजनेतही नाही.

गुजरात सरकारने धरणासाठी पैसा जमविण्यासाठी स्थानिक संस्था व उद्योगांना पाणी विकण्याची 'वॉटर मार्केटिंग'ची योजना काढली आहे. या वॉटर मार्केटिंगच्या बाजारात दुष्काळी, मागास प्रदेश कसा काय टिकेल ?

**धरणामुळे १४५० मेगॅवॅट वीज निर्माण होणार आहे**

ही फक्त स्थापित क्षमता आहे. प्रत्यक्षात वीज ४०० मेगॅवॅट एवढीच

राहणार असून ती पुढे ३० वर्षात कमी होत जाणार आहे. कारण

- नर्मदेतील पाण्याचा अंदाजित पाण्यापेक्षा प्रत्यक्षातील पाण्याचे प्रमाण कमी आहे.

- नर्मदा सागर वेळेत पूर्ण न झाल्याने वीजनिर्मितीत २५% घट होणार आहे.

- विजेचा सर्वात जास्त लाभ ज्या मध्य प्रदेशाला आहे, त्याच राज्याने धरणाची उंची १९ फुटाने कमी करण्याची मागणी केली आहे. ही १९ फूट उंचीच वीजनिर्मितीसाठी महत्त्वाची आहे.

**धरणामुळे पूर नियंत्रण होणार आहे.**

हा दावाही खोटा आहे, धरणांमुळे व तटबंधांमुळे पुराचा धोका अधिक वाढतो असा आजवरचा अनुभव आहे. नर्मदेतील बरगी व तवा धरणांमुळे १९९४ मध्ये सरदार सरोवराच्या बुडीत क्षेत्रात प्रचंड पूर आला. १९९९ मध्ये तापीच्या पुराचे पाणी उकई धरण फुटू नये म्हणून सोडावे लागले व परिणामी सुरत शहरात मोठा पूर आला. १९९९ च्या पावसाळ्यात बरगी, तवा, कोलार इत्यादी धरणांमुळे नर्मदेला प्रचंड पूर येऊन होशंगाबादसह अनेक शहरे गावे त्याच्या तडाख्यात सापडली. हजारो हेक्टर पीक वाहून गेले. पन्नास हजारावर लोक बेघर झाले होते. याच नर्मदा खोऱ्यात आणखी मोठ्या धरणांची ही योजना आहे!

## ३. धरणाला प्रतिकूल असलेले मुद्दे

### अफाट खर्च

धरणाचा खर्च प्रथम, रु. ४८८७ कोटी (टाटा इकॉनॉमिक कन्सल्टन्सी सर्विसेस, १९८३) रु. ६४०६ कोटी (नियोजन मंडळ, १९८८), रु. १३,००० कोटी (जागतिक बँक, १९८५), रु. ९,०००, रु. १०,००० ते रु. २५,००० कोटी (गुजरात सरकार, १९९० ते १९९५) असा वेगवेगळा सांगण्यात आला आहे. मात्र यात अनेक मूळ खर्चांचा समावेशच केलेला नाही कारण धरणाविषयीचे आजवरचे अभ्यास व आयोजने ही अपुरीच राहिली आहेत. जागतिक बँकेच्या एका अहवालात (१९९४) सरदार सरोवराचा खर्च ३४ हजार कोटी रुपये धरला आहे. त्यात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व पाणलोट (Catch ment ) क्षेत्र विकास असे अनेक खर्च धरले नव्हते. ते धरल्यावर हा खर्च ४४ हजार कोटी झाला. आता तर हा खर्च किमान ५०,००० कोटींपर्यंत गेला आहे. या धरणाला जागतिक बँकेची वा अन्य मदत नाही. मध्य प्रदेश राजस्थान सारख्या राज्यांनीही आपला वाटा नाही दिला. राष्ट्रीय प्रकल्प म्हणून याला मान्यता देण्याचे नाकारले. गुजरात सरकारच्या आवाक्यातील ही रक्कम नाही. म्हणून अवाच्या सवा (१८%) व्याज देऊन सरदार सरोवराचे रोखे बाजारात आणले. प्रत्यक्षात मात्र धरणाचा लाभदर हा १२% पेक्षा कमीच असल्याचा निष्कर्ष जागतिक बँकेच्या अहवालावरून काढता येतो.

### पर्यावरणाचा नाश

सरदार सरोवर धरणामुळे ३७,००० हेक्टरहून अधिक जमीन बुडणार आहे. पैकी

१३,७०० हेक्टराहून अधिक जंगल आहे. खेरीज, सुमारे ४५०० हे. जंगल महाराष्ट्रात, तळोदा-अक्कलकुवा भागात, पुनर्वसनाच्या नावाखाली तोडले आहे. या धरणाचे २५% लाभ ज्या नर्मदा सागर धरणावर अवलंबून आहेत

त्यामध्ये ९१,००० हेक्टरहून अधिक जमीन बुडणार आहे. त्यात ४०,००० हे. सघन जंगल आहे. सरदार सरोवरामुळे तथाकथित लाभक्षेत्रात किमान ४५% जमिनी चिबड (दलदल-खार) होतील असा प्राथमिक अभ्यासातील अंदाज आहे. नदीचे वाहते पाणी धरणात रोखल्यामुळे धरणानंतर शिल्लक राहणाऱ्या नदीच्या (डाऊन स्ट्रीम) काठावरील गावांमध्ये पाण्याचा प्रश्न भेडसावणार आहे. त्याचप्रमाणे नदीचा प्रवाह रोखल्याने भूगर्भातून समुद्राचे पाणी वर येऊन सुपीक जमीन खराब होण्याचाही (सी-इनग्रेस) धोका आहे.

जागतिक बँकेच्या मोर्स समितीसह (१९९२) अनेक तज्ज्ञांनी आपल्या अहवालांमधून या प्रतिकूल पर्यावरणीय मुद्यांकडे लक्ष वेधले आहे. नर्मदेतील या व इतर धरणांमुळे झिंगा (Prawn) मासळीच्या पैदाशीवर विपरीत परिणाम होणार आहे. भारतात गंगेच्या त्रिभुज प्रदेशात (सुंदरबन) व नर्मदेत झिंगा मासळी मिळते. हजारो मच्छीमार नर्मदेतील जैविक विविधतेच्या आधारे उपजीविका करतात. धरणांमुळे नर्मदेच्या खोऱ्यातील सुमारे दहा हजार मच्छीमार कुटुंबांची रोजीरोटी धोक्यात येणार आहे.

मोठ्या धरणांमध्ये पाण्याच्या साठ्यामुळे दलदल निर्माण होते त्यामुळे मलेरिया, फायलेरिया, सिस्टोसोमायसिस अशासारखे रोग पसरण्याची शक्यता जगातील बँकेच्या मोर्स समितीने व्यक्त केली आहे.

धरणांमुळे भूकंपाचा धोका वाढतो. नर्मदा खोरे हे भूकंपप्रवण क्षेत्रात वसलेले आहे. ते एका भूगर्भदोषाचे ( फॉल्ट झोन) स्थान आहे. त्यातून सरदार सरोवर तर अरवली क्षेत्र, पश्चिम घाट क्षेत्र व नर्मदा क्षेत्र या तीन भूगर्भ दोष स्थानांच्या तिठ्ठ्यावर राहणार आहे. सरोवरातील पाण्याच्या वजनाने भूकंपनीयतेचा धोकाही वाढणार आहे. त्याचे परिणाम थोडेफार दिसूही लागले आहेत. नुकतेच जबलपुर व खंडवा या भागांमध्ये भूकंपाचे धक्के येऊनही गेले आहेत.

''वन व प्राणीसृष्टी, पर्यायी वनीकरण, पाणलोट क्षेत्रविकास, लाभक्षेत्रविकास, धारण क्षमता, भूकंपनीयता, आरोग्य या सर्वच बाबतीत

धरणाचे लाभ अनिश्चित व हानी मात्र निश्चित आहे.

## सांस्कृतिक ऱ्हास ?

नर्मदा खोरे हे भारतीय इतिहास व पुरातत्त्वाचे आगर होय. भारतातील मानवाच्या ३ लाख वर्षांपूर्वीच्या अस्तित्वाचा एकमेव पुरावा नर्मदा खोऱ्यात हथनोरा येथे मिळाला. अश्मयुग, ताम्रपाषाण युग, सातवाहन, राष्ट्रकूट, कलचुरींपासून ते मोगल, ब्रिटीश व आधुनिक काळापर्यंत इतिहासाची अविच्छिन्न परंपरा नर्मदा खोऱ्यात आहे. मात्र या सर्वांचा सखोल अभ्यास, उत्खनन होण्याअगोदरच हा भाग धरणांखाली बुडविला जात आहे. या प्रकाराबद्दल अनेक पुरातत्त्वविदांनी, इतिहासकारांनी नाराजी दर्शविली आहे.

नर्मदा खोऱ्यात हजारो प्राचीन मंदिरे, घाट, तीर्थस्थाने, दरगे इ. आहेत. जगात फक्त याच एका नदीची परिक्रमा-नर्मदा परिक्रमा-होते. ही सर्व सांस्कृतिक परंपरा व वैभव नष्ट होण्याचा धोका या धरणांमुळे उत्पन्न झाला आहे. भारतातील तुलनेने कमी प्रदूषित नदी म्हणजे नर्मदा, परंतु तिचे सौंदर्यही आता धोक्यात आले आहे.

## विस्थापन व पुनर्वसन

जलाशयामुळे झालेल्या विस्थापितांची संख्या किमान अडीच लाख आहे. शिवाय कालव्यांच्या जाळयामुळे ही किमान २५००० कुटुंबीयांची जवळ-जवळ संपूर्ण जमीन जाणार आहे. धरणाच्या अभयारण्यासाठी ४२,००० आदिवासींना जंगल, जमिनीवरचा हक्क सोडावा लागणार आहे. जलग्रहण क्षेत्र, वनीकरण, दुय्यम विस्थापन, कॉलनीमुळे विस्थापित झालेली सहा गावे, या सर्वांचा तर विचारच केलेला नाही. थोडक्यात, या धरणामुळे किमान ८ लाख लोक या ना त्या रूपात प्रकल्पग्रस्त होणार आहेत.

गेल्या वीस वर्षांत यांच्यापैकी १०% लोकांचेही योग्य रीतीने पुनर्वसन

होऊ शकलेले नाही. खुद्द गुजरातेच्या बुडलेल्या पहिल्या गावाचचे अद्याप पुनर्वसन झालेले नाही आणि दुसरीकडे धरणाची उंची वाढवून अधिकाधिक गावे बुडीत क्षेत्रामध्ये आणली जात आहेत. जलाशयामुळे विस्थापित होणाऱ्या अडीच लाखाच्या संपूर्ण पुनर्वसनाचा तर बृहद् आराखडा (Master Plan मास्टर प्लॅन) अद्याप तयार नाही. ज्या थोड्यांचे पुनर्वसन झाले आहे त्यांचीही स्थिती अत्यंत वाईट आहे. कसायला जमीन नाही. आहे ती लागवडयोग्य नाही. कमी वा खराब आहे. घरे, पाणी, चारा, रोजगार काहीही नाही. या सगळ्यांच्या अभावी आरोग्याचे गंभीर प्रश्न आहेत. गुजरातेतील शेकडो प्रकल्पग्रस्त पुनर्वसनाच्या वसाहती सोडून मूळ गावी परत आले आहेत. मार्च १९९९ मध्ये व नंतरही अनेकदा महाराष्ट्रातील विस्थापितांनी राज्य सरकारला आह्वान दिले की पुनर्वसनासाठी जमीन कुठे आहे ते दाखवा. जमीन नसल्याची कबुली जबाबदार अधिकाऱ्यांनी दिली. त्याची चित्रफीतही उपलब्ध आहे.

मध्यप्रदेशाच्या आमदारांची डॉ. सिंगदेव समिती, खासदारांची भूरिया समिती (१९९४) व इतर सर्वेक्षकांनी, गुजरातेतील म.प्र. च्या विस्थापितांची स्थिती दयनीय असल्याचे म्हटले आहे. गुजरातच्या पीपल्स युनियन फॉर सिविल लिबर्टीज (पीयूसीएल), गुजरात विस्थापन संकलन समिती यांनी गुजरातच्या विस्थापितांची दुःखी स्थिती समोर आणली आहे. महाराष्ट्रातही 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस' (१९९३) व खासदार गावित व विवेक पंडित (१९९४) या राज्यसरकार समिती यांच्यो अहवालांनीही पुनर्वसनाच्या दयनीय स्थितीवर प्रकाश टाकला आहे.

याचा परिणाम म्हणून गुजरातच्या प्रकल्पग्रस्तांनी ही आता संघर्षाचा पवित्रा घेतला आहे. योग्य पुनर्वसन करणे शक्य नसेल तर बुडालेल्या जमिनी मोकळ्या करून द्या अशी मागणी करून. धरणाचे स्लुईसेस खोलून किंवा कसेही करून व गुजरातच्या विस्थापितांचे पूर्ण पुनर्वसन झाल्याशिवाय मध्य

प्रदेश व महाराष्ट्राच्या विस्थापितांना गुजरातेत आणू दिले जाणार नाही असा इशारा त्यांनी दिला आहे.

## पर्यायी उपायांचा शोध

सरदार सरोवर धरण बांधले गेले तरीही कच्छ सौराष्ट्र व उत्तर गुजरात यांच्या पाण्याचा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी वेगळी दृष्टी व कार्यक्रम हवा. गुजरातमधलेच अनेक तज्ज्ञ, कार्यकर्ते व संस्था यांनी विकेंद्रित, टिकाऊ पाणी-व्यवस्थापनाचे प्रयोग केले आहेत. भर दुष्काळातही ते यशस्वीरीत्या त्या-त्या भागाच्या पाण्याच्या गरजा भागवत आहेत. त्यांची आता आपण ओळख करून घेऊ या

माहिती उत्थान (धोळका, सुरेंद्रनगर), आगाखान ग्राम समर्थन कार्यक्रम (जुनागढ व सुरेंद्रनगर) लोकभारती (सणोसरा, भावनगर), विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट व जनविकास (कच्छ) अशा संस्था, समूहांनी पाणलोट (Calchment) क्षेत्र विकास, विकेंद्रित छोट्या योजना, न्याय्य पाणी वापर व वाटप करून यशस्वीपणे पाणी-नियोजन करीत आहेत.

२. १९९४ पासून 'सौराष्ट्र लोक मंच', स्वाध्याय परिवार व इतर संघटनांनी सौराष्ट्रात विहीरींच्या पुनर्भरणाची मोहीम सुरू केली आहे. या मंचाचे श्यामजी भाई अंटाळा यांच्या सांगण्यानुसार सौराष्ट्रातल्या सात लाख विहिरींपैकी २ लाखांचे रिचार्जिंग झाले तरी ५ ते ७ वर्षात संपूर्ण सौराष्ट्रातील भूजलस्तर वर येईल. यासाठी मोठे बजेट, नोकरशाहीचा डोलारा इत्यादींची गरज नाही. आपल्या शेतीच्या, गावाच्या पातळीवर हे काम होऊ शकते.

३. गुजरात भू-विकास महामंडळाकडे संपूर्ण कच्छ व सौराष्ट्रासाठी एक योजना होती. त्या योजनेनुसार, या भागात पडणाऱ्या पाण्याला अडवून किमान पिण्याच्या पाण्याची हमी मिळू शकते. महामंडळाचे उपनिदेशक पी.एच. वोहरा यांच्या म्हणण्यानुसार या भागात पडणाऱ्या पावसाचे १५ दशलक्ष

एकर फूट पाणी वाहून जाते; तर या क्षेत्रातल्या पिण्याच्या पाण्याची गरज भागवण्यासाठी ०.८४ दएफू पाण्याची गरज आहे. त्याला अडवण्याची गरज आहे. सध्याचे गुजरातचे नर्मदा परियोजना विकास? मंत्री जयनारायण व्यास १९९३ मध्ये विरोधी पक्षाचे आमदार असताना विधानसभेत म्हणाले की "कमी पावसाच्या दिवसात देखील गुजरातेत १०५ दशलक्ष एकर फूट पाऊस पडतो. त्यातील फक्त ८ दएफू पाणी (८%) अडविले जाते. हेच प्रमाण २०% झाले तर सरदार सरोवराच्या दुप्पट पाणी मिळेल."

४. सौराष्ट्र व उत्तर गुजरातेतील भूजलाचे बेसुमार शोषण व वापर गेली अनेक दशके चालू आहे. गुजरात भूजल विकास महामंडळाचे संचालक पी.एन. फडतरे यांनी स्पष्ट केले की १९८४ मध्ये जिल्ह्यांमध्ये भूजलाचा वापर-अमरेली (१४४%), मांगरोल (११७%) मेहसाणा (३७८%) इतका गेला होता. त्यांच्याच म्हणण्यानुसार गुजरातमधील पावसाच्या प्रमाणात १९८० च्या दशकात फारसा फरक पडला नाही. प्रत्येक दुष्काळी वर्षानंतर चांगल्या पावसाचे वर्ष येते. त्यावेळी ते पाणी विविध माध्यमांतून भूगर्भात उतरवणे आवश्यक आहे. त्याचा खर्च धरणाच्या खर्चापेक्षा कितीतरी कमी येतो.

५. सरदार सरोवराची सध्याची प्रस्तावित उंची १०० मीटर्सनी कमी करून त्यातून थेट कच्छला पाणी नेणारा एक्सैल्स कालवा करावा, पाण्यावर आधारित जैवभार (Biomass बायोमास) करावा अशा महत्त्वाच्या शिफारशी असलेला एक पर्याय सुहास परांजप्ये व के.जे. जॉय यांनी १९९४ मध्ये व पुन्हा १९९९ मध्ये मांडला. त्या नुसार गुजरातच्या वाट्याचे पाणी कमी होणार नाही.

६. सरदार सरोवर धरणाची सध्याची प्रस्तावित उंची कमी करून विस्थापन, जमीन, जंगल वाचवण्याचे अनेक प्रस्ताव मध्यप्रदेशातील अनेक अभियंते, तज्ज्ञ यांनी (के.सी.एस.आचार्य, मतीन एहमद, आर.एल. गुप्ता, एम.एन. नाडकर्णी) आजवर अनेक वेळा मांडले. मध्यप्रदेश सरकारने सर्वोच्च

न्यायालयातील खटल्यातही सरदार सरोवर धरणाची उंची ४३६ फूट व ३८४ फुटापर्यंत आणावी अशी मागणी केली. १९९९ मध्ये तर मध्यप्रदेशाने सर्वोच्च न्यायालयात दिवाणी दावा दाखल करून संपूर्ण नर्मदा जलविवाद न्यायाधिकरण निवाड्याचा पुनर्विचार व नवे न्यायाधिकरण यांची मागणी केली होती.

७. नर्मदा बचाव आंदोलनाने १९८९ पासूनच धरणाचा सर्व अंगांनी, लोकसहभागासह पुनर्विचार करण्याची मागणी वारंवार समोर ठेवली. कोणत्या मुद्यांचा पुनर्विचार करावा व त्यासाठी कोणती प्रक्रिया अवलंबावी याचाही तपशील त्यांनी दिला होता. केवळ सरदार सरोवरच नव्हे तर नर्मदा खोऱ्यातील सर्वच प्रस्तावित धरणांचा विस्थापन, लाभ-हानी, पर्यावरण, सामाजिक न्याय या अंगांनी पुनर्विचार करावा व विकेंद्रित, पर्यावरणीय, टिकाऊ पर्याय हाती घ्यावेत असा आग्रह नर्मदा बचाव आंदोलनाने धरला आहे. त्यानुसार मध्यप्रदेश सरकारने १९९८ मध्ये एका कृतीगटाची (Task Force टास्क फोर्स) स्थापना करून आंदोलनाच्या सहाय्याने पर्यायांचा पुनर्विचार केला. त्याचा अहवालही प्रसिद्ध झाला आहे.

## आधार / संदर्भ


- Facts (फॅक्टस्) - १९९० ते १९९५, सरदार सरोवर नर्मदा निगम लि., गांधीनगर.
- Planning for Prosperity : Narmada Planning Group : Sardar Sarovar Narmada Nigam Ltd., Gandhinagar, 1989
- Staff Appraisal Report (Water Delivery and Drainage Project) : World Bank, 1985
- Project Completion Report : World Bank : 1995 March
- Report of the tenth Estimates Committee of Gujarat Assembly, headed by Suresh Mehta.
- Sardar Sarovar : Report of Independent Review Mission, Resource Future Institute, Canada 1992 (Morse Committee)
- केंद्रीय जलसंसाधन विभागाचे नर्मदा बचाव आंदोलनास पत्र, ऑक्टोबर १९९३
- Study by Operation Research Group, Baroda for Narmada Planning Group
- Letter to the Prime Minister from Madhya Pradesh Chief Minister, 4/3/1994
- Indian Exprees Baroda, 13.8.1993 & 17.10.1996
- Times of India, Ahmedabad 14.6.1997
- Bhoomiputra, Baroda (1.7.1993)
- Times of India, Ahmedabad 1.6.1990
- Loksattta-Jansata, Baroda 29.4.1990
- Water for Gujarat : Ashwini Shah, JVA, Dharwad, 1993
- Shyamjibhai Antala, a note on 10.10.1999
- Petition of Kutch Jal Sankat Nivaran Samiti, Special Leave application in Gujarat High Court, April, 1999
- Downstream Impacts : A Voiceless Tragedy. Trupti Soni-1993

# नर्मदा घाटीत प्रस्तावित मोठ्या योजनांची माहिती

| अ. क्र. योजना | योजनेची अंदाजे किंमत (कोटी रुपयात) | प्रस्तावित सिंचित क्षेत्र (लाख हेक्टरमध्ये) | प्रस्तावित विद्युत क्षमता (मेगावाटमध्ये) |
|---|---|---|---|
| १. अप्पर नर्मदा | ५८.५५ | ०.१२८० | |
| २. राघवपूर | २६.६४ | - | २० |
| ३. रोसरा | ३२.०० | - | ३५ |
| ४. सिंगारपूर | १६५.७२ | - | ६० |
| ५. अपर बुढनेर | ५९.८० | ०.०९४९ | |
| ६. हालोन | ४५.०० | ०.११७३ | |
| ७. मटियारी | ३०.०० | ०.१०११ | |
| ८. बरगी | | | |
| (क) डावा कालवा | ५६५.६० | ४.३७०० | ९० |
| (ख) बरगी धरण वळण | ९९५.२० | | |
| ९. अटारिया | ३०.१६ | ०.१२९५ | |
| १०. चिंकी | ७६.५७ | ०.७०८२ | |
| ११. शेर<br>१२. मछरेवा<br>१३. शक्कर | ९३.२३ | ०.६४७६ | |
| १४. सीतारेवा | ४.०० | | १५ |
| १५. दूधी | ४२.३६ | ०.५०६० | |
| १६. बारना | १८.९० | ०.५४८० | |
| १७. तवा ११३.०० | २.४६९० | | |
| १८. कोलार १२०.०० | ०.४५१० | | |
| १९. मोरण्ड<br>२०. गंजाल | ६४.१० | ०.४८०० | |
| २१. सुक्ता १२.६० | ०.१६६० | | |
| २२. पुनासा उपसा | ५७२.९८ | ०.३२३० | |
| २३. इंदिरा सागर | २१६७.६७ | १.४१०० | १००० |
| २४. ओंकारेश्वर | ७८८.०३ | १.२९०० | ५२० |
| २५. माहेश्वर | ४६५.६३ | | ४०० |
| २६. अप्पर बेदा | २०.४८ | ०.१०९० | |
| २७. मान ४४.१० | ०.१५०० | | |
| २८. लोअर गोई | २२.७९ | ०.१३७० | |
| २९. जोबट ३०.७५ | ०.०९८५ | | |

(Soure : Samagra Vikas, Narmada Valley Development Authority: M.P. Bhopal, probably June 1997)

- वरील सर्व किंमती आता कालबाह्य झालेल्या आहेत.
- लाभ हा वाढवून सांगितलेला आहे.
- कोणत्याच प्रकल्पाचा पूर्ण अभ्यास झाला नाही.
- पुनर्वसनाचा प्रश्न भयानक आहे.
- बर्गी, तवा, कोलार, सुक्ता ह्या पूर्ण झालेल्या प्रकल्पामुळे विस्थापित लोकांचे अजून पुनर्वसन झालेले नाही. त्यांना पुनर्वसनाचा अजून फायदा झाला नाही.
- महेश्वर, वेदा, गोया, जोबाट, आणि माना ह्या प्रकल्पावर संघर्ष सुरू आहे.
- प्रकल्पग्रस्त जागा सोडायला तयार नाही.
- सर्वंकष सहभागाने पुनर्विचार आणि विजनिर्मिती आणि पाणी व्यवस्थापन ह्यासाठी विकेंद्रीत पर्यायाची मागणी केली जात आहे.

## नर्मदा खोऱ्यातील पूर्ण झालेल्या सहा प्रकल्पाच्या सिंचन क्षमतेची सद्यस्थिती

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव | वार्षिक सिंचन नियोजन(हे.) | १९९१-९२ हे. | १९९१-९२ % एकूण नियोजनाच्या | १९९२-९३ हे. | १९९२-९३ % एकूण नियोजनाच्या | १९९५-९६ हे. | १९९५-९६ % एकूण नियोजनाच्या | सरासरी सिंचन हे. | सरासरी सिंचन % एकूण नियोजनाच्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बर्गी (रानी अवंतीबाई सागर) | २१९८०० | १२१०० | ५.५१% | १५००० | ६.८०% | ४७०० | २.१०% | १०६०० | ४.८२% |
| २ | मतीयारी | १३६६२ | ३०५८ | २२.३८% | २९६४ | २१.६९% | ७१८ | ५.२५% | २२४७ | १६.४४% |
| ३ | कोलार | ६०८७६ | १०८९१ | १७.८९% | २०९०६ | ३४.३४% | २०००० | ३२.८५% | १७२६६ | २८.३६% |
| ४ | तवा | ३३२७८३ | १७५९१४ | ५२.८६% | १८७४४४ | ५६.३२% | १७६२९० | ५२.९७% | १७९८८३ | ५४.०५% |
| ५ | बरना | ६०५१२ | ३३७७५ | ५५.८६% | ३२७४० | ५४.१०% | ३११६३ | ५१.५०% | ३२५५९ | ५३.८०% |
| ६ | सुक्ता | १८५८३ | ४०६२ | २१.८६% | ९०० | ४.८४% | ५११० | २७.९३% | ३३८४ | १८.२१% |
| | एकूण | ७०६२१६ | २३९८०० | ३३.९६% | २५९९५४ | ३६.८०% | २३८०६१ | ३३.७१% | २४५९३१ | ३४.८२% |

*Source : Narmada Control Authority, Annual Water of Narmada Basin Upto Sardar Sarovar Dam site - Year 1991-92, 1992-93, 1995-96*

# आंदोलनाची वाटचाल

१९४६ -

या वर्षात मध्यप्रांत आणि वऱ्हाड आणि मुंबई येथील शासनांनी केंद्रीय जलमार्ग, सिंचन व नौवहन आयोग Central Water Ways, Irrigation and Navigation Commision (CWINC) या संस्थेला पूर नियंत्रण, जलसिंचन व वीजनिर्मिती तसेच दळणवळणासाठी वाहतूक क्षमता कशी वाढवता येईल या दृष्टीने नर्मदा नदीच्या संपूर्ण खोऱ्याचा विकास करण्यासाठी नदीच्या प्रवाहाची पाहणी करण्याची विनंती केली. CWINC ने, पाण्याचा साठा करण्यासाठी योग्य अशा वेगवेगळ्या सात जागा, त्या पाहणीसाठी निश्चित केल्या.

१९४८ -

वीज मंत्रालयाने (Ministry of Power) श्री ए.एन. राव डॉ. जे. एल्. सावजे आणि श्री एम. नरसिंहय्या या तीन सदस्यांची समिती स्थापन करून तिला वरील सात स्थळांचा अभ्यास करण्यास सांगितले. परंतु साधनसंपत्तीची कमतरता असल्यामुळे समितीने त्यापैकी बर्गी, तवा, पुनासा आणि भरूच या चारच जागा पाहणीसाठी निश्चित केल्या.

१९४९ -

या वर्षी पाहणीचे काम प्रत्यक्ष हाती घेण्यात आले. त्यापैकी तवा, पुनासा आणि भरूच या प्रकल्पांचे अहवाल तयार झाले.

१९५५ -

या वर्षात CWINC चे नामांतर होऊन तो केंद्रीय जल व विद्युत आयोग (CWPC) या नावाने ओळखली जाऊ लागली. आयोगाने १६ जागांचे सर्वेक्षण करून, जलविद्युत निर्मितीसाठी तेथे काय परिस्थिती आहे त्याचा आढावा घेतला. तेथून १.३ दशलक्ष (एक लाख तीस हजार) किलोवॅट एवढी वीजनिर्मिती होऊ शकत होती. या सोळा जागांपैकी एक जागा गुजरातमध्ये होती.

१९५६ -

पहिल्या टप्प्यात १६० फूट एफ्. आर. एल. (Full Reservoir Level- पूर्ण जलाशय पातळी) चे धरण कोठे बांधता येईल आणि त्याची वार्षिक सिंचन क्षमता ४.४४ लाख एवढी असेल असे मत CWPC ने आपल्या पाहणीच्या आधारावर मांडले. परंतु तेव्हा नवगाम (भरूच) या जागेचे सर्वेक्षण झालेले नव्हते.

१९५७ -

या वर्षी CWPC च्या अध्यक्षांनी एक बैठक घेतली. तिला मध्यप्रदेश आणि मुंबई या राज्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. याच वर्षात फेब्रुवारीमध्ये केंद्रीय जल व विद्युत आयोगा (CWPC) च्या एका सदस्याने गोरा येथील तपासणी केली तेव्हा त्यापूर्वी ती चांगल्या रीतीने झाली नसल्याचे त्याच्या लक्षात आले.

१९५९ -

१) आयोगाने आपला अहवाल मुंबई सरकारला सादर केला. त्यातच सरदार सरोवर प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला होता. हीच त्या प्रकल्पाची सुरुवात होय. नवागाम प्रकल्प दोन टप्प्यांत बांधावा अशी शिफारस त्यामध्ये करण्यात आली होती. त्याचा पहिला टप्पा १६० फूट आणि दुसरा टप्पा ३०० फूट संपूर्ण जलाशय स्तराचा असणार होता. पहिल्या टप्प्याचा खर्च त्यावेळी ३३ कोटी रुपये इतका होता. त्यावर मुंबई सरकारने अशी सूचना केली की दुसरा टप्पा ३२० फूट संपूर्ण जलाशय स्तराचा असावा.

२) जानेवारी १९५९ मध्ये वीज मंत्रालयाने नवगाम प्रकल्पाची पुन्हा पाहणी करण्यासाठी एक तज्ज्ञमंडळ नियुक्त केले.

१९६० -

१) पांटबंधारे व वीज मंत्रालयाने नियुक्त केलेल्या या तज्ज्ञमंडळाने आपला अहवाल एप्रिल १९६० मध्ये सादर केला. त्यामध्ये, धरणाचे संपूर्ण ३२० एफ्.आर्.एल्. (Full Reservoir level- पूर्ण जलाशय पातळी) पर्यंतचे

बांधकाम एकाच टप्प्यात पूर्ण करावे अशी शिफारस करण्यात आली होती. अशा रीतीने ते काम केल्यास कच्छ आणि सौराष्ट्र यांनाही त्याचा फायदा मिळेल असे तज्ज्ञांना वाटले होते.

२) १ मे १९६० रोजी महाराष्ट्राचे स्वतंत्र राज्य उदयाला आले. नवागाम गुजरात राज्यामध्ये गेल्यामुळे नवागाम प्रकल्पाचे नियोजनही गुजरातकडे गेले.

३) ऑगस्ट १९६० मध्ये नियोजन मंडळाने १६० फूट उंचीचा, धरणाच्या पहिल्या टप्प्याच्या बांधकामाला मंजुरी दिली. याचा वापर फक्त पाणीपुरवठ्यासाठी केला जाणार होता. दुसऱ्या टप्प्यामध्ये ३२० एफ्.आर्.एल्. उंचीपर्यंत वाढवण्याची त्यामध्ये तरतूद करण्यात आली. या दुसऱ्या टप्प्यात ६२५ मेगावॅट वीजनिर्मिती होणार होती.

४) गुजरात शासनाने सर्व्हे ऑफ इंडिया या संस्थेकडून पुनासा आणि नवगाम येथील पाणलोट क्षेत्राचे सर्वेक्षण करून घेतले.

१९६१ -

१) फेब्रुवारी १९६१ मध्ये गुजरात शासनाने नवगाम येथील धरणाला तो पर्यंत सरदार सरोवर नाव नव्हते. प्रशासकीय मान्यता दिली आणि त्याच वर्षी एप्रिलमध्ये, तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्याचे रीतसर उद्घाटन केले.

२) धरणाच्या कर्मचाऱ्यांसाठी वसाहतीसाठी म्हणून प्रस्तावित केवडीया कॉलनीसाठी सहा खेड्यांची जमीन संपादित करण्यात आली.

३) उंच पातळीवरून कालवा काढून या जलाशयातील पाणी कच्छच्या रणाला पुरवले जाऊ शकेल किंवा कसे याबाबत गुजरात सरकारने सर्वेक्षण केले. त्यामध्ये असे निदर्शनास आले की धरणाची उंची ४६० फूट एफ्.आर्.एल्. असली तरच धरणाच्या पाण्याचा पुरेपूर उपयोग केला जाऊ शकेल. त्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी नवगामच्या आसपासच्या तीन जागांवर पाहणी करण्याचे काम सुरू झाले.

१९६३ -

१) एप्रिल १९६३ मध्ये नवगामची जागा मोठ्या धरणासाठी चांगली आहे असे भूगर्भ सर्वेक्षणाने सुचवल्यावरून तेथील तिसरी जागा निश्चित करण्यात आली (पहिल्या दोन जागा कोणत्या ते स्पष्ट झाले नाही.)

२) बर्गी प्रकल्पाचा खोळंबलेला अहवाल केंद्रीय जल व विद्युत आयोगाने सादर केला.

३) नोव्हेंबर १९६३ पाटबंधारे व वीज विभागाचे केंद्रीय मंत्री डॉ. के.एल.राव यांनी भोपाळ येथे गुजरात व मध्यप्रदेशाच्या मुख्यमंत्र्यांची बैठक घेतली व तीमध्ये पुढील ठराव मंजूर झाले.

अ) नवगाम येथील धरण ४२५ फूट एफ्.आर्.एल्. उंचीचे बांधले जाईल आणि त्याचे सगळे फायदे गुजरात राज्यालाच मिळतील.

ब) पुनासा येथील धरण ८५० फूट एफ्.आर्.एल्. (FRL) उंचीचे बांधले जाईल त्याचे फायदे १:२ या प्रमाणात गुजरात व मध्यप्रदेश यामध्ये विभागले जातील. मध्य प्रदेशाच्या वाट्याला येणाऱ्या विजेपैकी अर्धी वीज त्याने २५ वर्षेपर्यंत महाराष्ट्राला द्यावी. त्याचा बदल्यात महाराष्ट्र पुनासा धरणाच्या खर्चाचा १/३ वाटा उचलील.

क) बर्गी हे धरण मध्यप्रदेशाने बांधावे. पहिल्या टप्प्यात त्याचे १३६५ फूट एफ्.आर्.एल्. उंचीचे बांधकाम होईल. गुजरात आणि महाराष्ट्र मिळून या प्रकल्पासाठी १० कोटीचे कर्ज देतील. परंतु २८ नोव्हें. १९६३ रोजी मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री डी.पी. मिश्रा यांनी, मध्यप्रदेशाचे राज्य या ठरावांशी सहमत नसल्याचे कळवले. नवगाम धरण १६२ फूट FRL इतकेच असावे असे मध्य प्रदेश सरकारने म्हटले, परंतु गुजरातने त्यामध्ये पुन्हा दुरुस्ती करून ते ४२५ फूट FRL इतके केले.

१९६४ -

वरीलप्रमाणे उंची वाढवण्याचा प्रस्ताव गुजरातने १९६४ साली नियोजन आयोगाकडे सादर केला. हा गुंता सोडवण्यासाठी सप्टेंबर १९६४ मध्ये डॉ.

ए.एन. खोसला यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. या समितीच्या बैठका आणि विचारविनिमय चालू असतानाच महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश यांनी जलसिंधी करारावर सह्या केल्या.

१९६५ -

१) मार्च १९६५ मध्ये मध्यप्रदेश सरकारने नर्मदा खोरे विकासाचा स्वतः तयार केलेला आराखडा सादर केला. त्यामध्ये जलविद्युत निर्मितीचे केंद्र जलसिंधी येथे असावे असे प्रस्तावित करण्यात आले होते. जलसिंधी कराराप्रमाणे, या जलसिंधी प्रकल्पाचा खर्च आणि त्याचे फायदे महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशाने ठराविक प्रमाणात वाटून घ्यावयाचे होते.

२) सप्टेंबर १९६५ मध्ये खोसला समितीने आपला अहवाल सादर केला. त्यामध्ये पुढील शिफारशी करण्यात आल्या होत्या.

अ) मध्यप्रदेशातील रोसरा, बर्गी, सितारेवा, तवा, कोलार इ. १२ ठिकाणी व गुजरातमधील नवगाम येथे याप्रमाणे १३ मोठे प्रकल्प उभारण्यात यावेत.

ब) नवगाम धरणाची उंची ५०० फूट एफ्.आर्.एल्. इतकी असावी. तेथे १४०० मेगावॅट क्षमतेचे वीजनिर्मिती केंद्र उभारावे.

क) या प्रकल्पाचे पाणी राजस्थानलाही मिळावे.

गुजरातने हा अहवाल स्वीकारला, तर मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राने तो फेटाळून लावला.

१९६६-६७ -

नर्मदा नदीच्या पाण्याचे व इतर फायद्यांचे राज्यांमध्ये कसे वाटप करावे यावर बरीच भवती न भवती झाली.

१९६८ -

चर्चेतून निष्पन्न काहीच न निघाल्यामुळे ६ जुलै १९६८ रोजी गुजरातने भारत सरकारला एक पत्र पाठवले. त्याचा परिणाम म्हणून ६ ऑक्टो. १९६९

Aalochana

रोजी काढलेल्या अधिसूचने अन्वये नर्मदा जलविवाद न्यायाधिकरणाची स्थापना करण्यात आली. नर्मदेच्या पाण्याचे वाटप आणि नवगाम धरणाची उंची हे विषय त्याकडे सोपवण्यात आले.

१९७१ ते ७४ -

वर्ष १९७१-७२ मध्ये न्यायाधिकरण आणि संबंधित राज्यांचे मुख्यमंत्री यांच्या मध्ये बरीच साधक-बाधक चर्चा झाली. वर्ष १९७४ मध्ये न्यायाधिकरणाने, राज्यांनी आपसात केलेल्या समझोत्यावर शिक्कामोर्तब केले.

१९७८ -

१) या वर्षात न्यायाधिकरणाचा अंतिम निवाडा जाहीर करण्यात आला. त्यामध्ये नवगाम प्रकल्पाची (आतापर्यंत त्याचे नाव सरदार सरोवर असे झाले होते.) उंची, त्याच्या खर्चाची आणि फायद्यांची विभागणी, पुनासा प्रकल्प (नर्मदा सागर) याचा खर्च व पाण्याची गुजरात-मध्यप्रदेश यामधील वाटणी आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे सरदार सरोवर प्रकल्पामुळे होणाऱ्या महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशामधून विस्थापितांचा प्रश्न यांचा समावेश होता. त्यामध्ये, सरदार सरोवर धरणाची उंची ४५५ फूट असावी असा निवाडा देण्यात आला.

२) जागतिक बँकेचा या प्रकरणात प्रवेश कर्ज देण्याच्या हेतूने नर्मदा प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी नोव्हेंबर १९७८ मध्ये भारतात आलेल्या जागतिक बँकेच्या प्रतिनिधी मंडळाचे गुजरात सरकारने स्वागत केले.

३) सरदार सरोवरामुळे मध्यप्रदेशातील बुडितात येणाऱ्या निमाड या सुपीक प्रदेशाला वाचविण्यासाठी व धरणाची उंची कमी करण्याच्या मागणीसाठी 'निमाड बचाओ आंदोलन' त्या भागात काही काळ चालले. तत्कालीन विरोधी पक्ष नेते ते मोतीलाल वोरा, अर्जुनसिंह, शंकरदयाल शर्मासह अनेक जणांनी त्यासाठी अटक करवून घेतली.

१९७९ -

१) ऑपरेशन रिसर्च ग्रुप (ORG) बडोदा आणि टाटा इकॉनॉमिक

कन्सल्टन्सी सर्विसेस (TECS) या संस्थांनीही या प्रकल्पातील काही मुद्यांचा अभ्यास सुरू केला.

२) नर्मदा जलविवाद न्यायाधिकरणाने (NWDT) नर्मदा पुनरीक्षण समितीची स्थापना केली.

३) गुजरात पाटबंधारे विभागाला जागतिक बँकेकडून प्रकल्पाचा आराखडा बनविण्यासाठी एक कोटी अमेरिकन डॉलर्सचे कर्ज मिळाले.

१९८० -

१) कॉंग्रेस व जनता पार्टी मतभेदांमुळे निमाड बचाओ आंदोलन फुटले, समाप्त झाले.

२) केंद्र सरकारने पर्यावरण मंत्रालयाची स्थापना करून वन (संरक्षण) अधिनियम संमत करून घेतला त्यामुळे सरदार सरोवर प्रकल्पाला पर्यावरणाच्या दृष्टीने मंजुरी घेणे आवश्यक झाले.

१९८३ -

१) टाटा इकॉनॉमिक कन्सल्टन्सी सर्विसेसने प्रकल्पाच्या लाभ-हानी चा हिशोब करून बाजार मूल्याने त्याचे गुणोत्तर १:३९ तर आर्थिक मूल्याने ते १:८४ असल्याचे सादर केले. त्यात अनेक मूळ खर्च समाविष्ट नव्हते, कारण त्याबद्दल अध्ययन व आयोजन केलेले नव्हते.

२) जागतिक बँकेकडून कर्ज मिळण्याच्या शक्यतेचा अंदाज घेण्यासाठी योजनेचा प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू.

३) प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या गुजरातमधील लोकांचा मेळावा भरून त्यांनी त्यांच्या पुनर्वसनाबाबतच्या मागण्या मांडल्या.

१९८४ -

१) सागर विद्यापीठाने सरदार सरोवर प्रकल्पाचा पर्यावरणावर काय परिणाम होईल याचा प्राथमिक अभ्यास केला. परंतु निष्कर्षाप्रत येण्यासाठी आणखी सविस्तर अभ्यासाची गरज प्रतिपादन केली.

२) मध्य प्रदेशाच्या सरकारच्या, पर्यावरणीय नियोजन आणि समन्वय संघटनेने नर्मदा सरोवर प्रकल्पाच्या पर्यावरणीय प्रभावाचे (पर्यावरणावर काय परिणाम होईल त्याचे) अध्ययन करून ते १९८४ मध्ये त्याचा अहवाल सादर केला.

१९८५ -

१) फेब्रुवारी १९८५ मध्ये जागतिक बँकेने आपल्या पाहणीचा अहवाल सादर केला. मे १९८५ मध्ये महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश यांनी विश्व बँकेकडून कर्ज मिळण्याच्या करारावर सह्या केल्या. त्याचप्रमाणे पर्यावरणीय प्रभाव निर्धारण (पर्यावरणावरील परिणाम निश्चित करण्याचे काम - Environmental Impact Assessment) आणि पुनर्वसन हे दोन्ही कार्यक्रम ठरल्याप्रमाणे पार पडले नाहीत तर कर्ज रोखून ठेवले जाईल अशीही अट त्यामध्ये घालण्यात आली होती.

१९८६ -

१) TECS ने नर्मदा सागर धरणाचा अभ्यास करून त्याचे लाभ-हानी गुणोत्तर १:०.९९९ असल्याचे सादर केले.

२) एप्रिल १९८६ मध्ये पर्यावरण व वन मंत्रालयाने एक अहवाल तयार केला, त्यात पुढील गोष्टी नमूद केल्या होत्या-

अ) सरदार सरोवर व नर्मदा सरोवर या दोन्ही प्रकल्पांचे पर्यावरणीय परिणाम निर्धारण (EIA) पूर्ण झालेले नसून, त्यासाठी आणखी २-३ वर्षे लागतील.

ब) नर्मदा सागर धरणाचे पर्यावरणीय प्रश्न सरदार सरोवराच्या प्रश्नांपेक्षा जास्त गंभीर असण्याची शक्यता आहे.

क) पुनर्वसनाकरता आवश्यक असलेली जमीन उपलब्ध आहे काय याचे सर्वेक्षण अद्याप झालेले नाही. आतापर्यंत तिच्या १/३ पेक्षाही कमी इतकीच जमीन त्यासाठी निवडली आहे.

ड) नर्मदा सागर धरणाची उंची कमी करण्याची अत्यंत

आवश्यकता आहे. ती थोडी'जरी कमी केली तरी बुडीत क्षेत्र फार मोठ्या प्रमाणावर कमी होईल. मात्र सिंचनक्षेत्रावर त्याचा फारसा विपरीत परिणाम होणार नाही.

मंत्रालयाने ही दोन्ही धरणे मंजुरीसाठी तयार नाहीत असे सांगून त्यांची मान्यता रोखून धरली. त्यानंतर जल संसाधन मंत्रालयानेही यावर एक सूचना काढली व त्यावर तातडीने निर्णय घेण्यात यावा अशी शासनाला विनंती केली. मंजुरी मिळवण्यासाठी जे अभ्यास करणे आवश्यक होते ते करण्यात आलेले नाहीत याची ही या अहवालात कबुली देण्यात आली होती.

४) विश्व बँकेकडून सरदार सरोवर प्रकल्पासाठी ४५ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर झाले.

१९८६ -८७

अहमदाबाद येथील सेतु (SETU) या संस्थेत काम करणाऱ्या मेधा पाटकर यांनी प्रत्यक्ष खोऱ्यात हिंडून या प्रश्नाचा अभ्यास सुरू केला. धुळे (आता नंदुरबार) जिल्ह्यातील अक्राणी, अक्कलकुवा तालुक्यातील गावांची नर्मदा धरणग्रस्त समिती स्थापन, विस्थापन व पुनर्वसन झाली. महाराष्ट्र सरकारला जाब विचारणे, माहिती काढणे यावर भर. विस्थापन हे गृहीत धरले नाही. याच सुमारास धुळ्यात नर्मदा धरणग्रस्त सहाय्यक समितीची स्थापना.

१९८६-८७ च्या सुमारास मध्य प्रदेशातील काही ज्येष्ठ सर्वोदयी कार्यकर्ते व नर्मदा खोऱ्यातील प्रमुख ग्रामस्थांनी 'नर्मदा घाटी नवनिर्माण समिती' स्थापन केली. प्रत्यक्ष संघटन कार्य नसले तरी 'समिती' ने सरदार सरोवर व एकंदरच मोठ्या धरणांच्या विरोधात काही तत्त्वांच्या व अनुभवांच्या आधारावर भूमिका घेतली हे विशेष. मध्यप्रदेशातील वृत्तपत्रांतून अनेक तज्ज्ञ लेखकांनी या प्रकल्पावर आक्षेप घेतले.

१९८८ च्या मध्यात नर्मदा धरणग्रस्त समितीच्या मेधा पाटकर, यांनी 'समिती' शी संपर्क केला. म. प्र. च्या निमाड क्षेत्रातील गावांमध्ये जाऊन संघटन-जागृतीला प्रारंभ केला. याच सुमारास झाबुआ जिल्ह्यातील

अलिराजपूर तालुक्यातील खेडुत मजदूर चेतना संगठन' शी संपर्क होऊन तेथील नर्मदा प्रकल्पग्रस्त देखील या संघर्षात आले.

याच सुमारास सरदार सरोवर प्रकल्पाला केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाची मंजुरी मिळाली नसल्याचे स्पष्ट झाले. या प्रकल्पाच्या संदर्भात अनेक मूलभूत व महत्वाचे अभ्यासच झाले नसल्याचे दिसले. त्याविनाच हे प्रकल्प लाभदायक मानले गेले. या सर्वांची तपासणी करताना संघटनेला जाणवले की विस्थापन व प्रकल्पाची प्रक्रिया व लाभहानी, इष्टानिष्टता यांचा संबंध आहे. हे सर्वच तपासून पाहण्याची गरज आहे.

३) एप्रिल १९८७ मध्ये तीन संबंधित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची पंतप्रधानांबरोबर बैठक होऊन, सरदार सरोवर योजनेला राष्ट्रहिताच्या नावाखाली मंजुरी देण्यात आली.

४) महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातील विस्थापितांनी नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाकडे आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

५) डिसेंबर १९८७ मध्ये गुजरात शासनाने शासन निर्णय (G.R.) काढून पुनर्वसनाच्या काही तरतुदी लागू केल्या त्या अशा :

अ) प्रत्येक विस्थापित भूमिहीन मजूर कुटुंबाला ५ एकर जमीन

ब) प्रत्येक अतिक्रमणदाराला ५ एकर जमीन आणि

क) प्रत्येक कुटुंबाला दोन वर्षेपर्यंत दररोज रु. १५ इतकी पुनर्वसन भरपाई दिली जाईल.

१९८८ -

१) दि. ३० जानेवारी १९८८ रोजी गुजरात, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश येथील ४००० प्रकल्पबाधित व्यक्तींनी केवडिया येथे एकत्र येऊन निदर्शने केली.

२) दि. २९ फेब्रुवारी रोजी, नर्मदा खोरे विकास प्राधिकरणा (म. प्र.) याचे अध्यक्ष श्री. एस.सी.शर्मा यांनी, प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसन व

पुनःस्थापन याबाबतीतील उदासीन धोरणाच्या निषेधार्थ राजीनामा दिला.

३) दि. १४ मे रोजी तीन्ही राज्यांतील संघटनांच्या प्रतिनिधींनी केवडिया येथे नर्मदा विकास प्राधिकरणाशी विस्थापन, पुनर्वसन व अन्य मुद्यांवर सविस्तर चर्चा केली. प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या मुद्यांना समाधानकारक उत्तर देऊ शकत नसल्याचे प्राधिकरणाच्या लोकांनी कबूल केले. या बैठकीनंतर या संघटनांनी 'नविप्रा' ला एक निवेदन देऊन दोन महिन्यात प्रकल्पासंबंधीच्या व पुनर्वसना बद्दलच्या मुद्यांना समाधानकारक उत्तरे द्यावीत, अशी मागणी केली. त्यानंतरही उत्तर मिळाले नाही. म्हणून १८ ऑगस्ट १९७७ रोजी धरण विस्थापनाला विरोध घोषित.

४) मे-जून मध्ये, गुजरातने विस्थापितांसाठी केलेल्या तरतुदी महाराष्ट्र व मध्य प्रदेशातील विस्थापितांनाही लागू करण्यासाठी कायदा करण्यात आला.

५) दि. १८ ऑगस्ट १९८८ रोजी नर्मदा बचाव आंदोलनाने सरदार सरोवर धरणाला संपूर्ण विरोध जाहीर केला. पुनर्वसन होणे अशक्य आहे आणि धरण हे सार्वजनिक हिताचे नाही हे त्यांना कळून चुकले होते. यामध्ये नर्मदा धरणग्रस्त समिती (महाराष्ट्र), नर्मदा घाटी नवनिर्माण समिती (म.प्र.) व नर्मदा असरग्रस्त संघर्ष समिती (गुजरात) या संघटनांचा समावेश होता. त्यांनी त्यांच्या त्यांच्या क्षेत्रातील तहसील कार्यालयात तशा आशयाची पत्रके नेऊन दिली. प्रकल्पाशी संबंधित कोणत्याही कामाशी-मग ते बांधकाम असो वा सर्वेक्षण-पूर्णतः असहकार पुकारीत असल्याचेही त्यांनी त्याद्वारे जाहीर केले. आंदोलनाच्या, देशभरातील अनेक समर्थकांनी त्याला पाठिंबा दिला. लाभहानी, विस्थापन, लोकांचे अधिकार, न्याय, पर्यावरण या अनेक मुद्यांवर धरण समर्थनीय नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.

६) दि. १२ सप्टेंबर रोजी देशातील ३०० संशोधक, शिक्षणतज्ज्ञ व नामांकित, मान्यवर व्यक्तींनी पंतप्रधानांना निवेदन पाठवून सरदार सरोवर प्रकल्पाचा पुनर्विचार करण्याची त्यांना विनंती केली.

७) ऑक्टोबर मध्ये विश्व बँकेचे वरिष्ठ उपाध्यक्ष श्री मोईन कुरैशी यांच्याशी प्रकल्पग्रस्तांनी दिल्ली येथे चर्चा केली.

८) १४ ते २१ नोव्हेंबर या दरम्यान कार्यकर्ते, पत्रकार, अर्थशास्त्रज्ञ अशा एकून ७० लोकांनी प्रकल्पबाधित गावांमधून संवाद यात्रा काढली. प्रकल्प पूर्ण झाल्यास गावकऱ्यांची काय परिस्थिती होईल ते समजावून सांगण्याचा त्यांचा उद्देश होता. १७-१८ डिसेंबर १९८८ रोजी गुजरात मधील २५ संस्था एकत्र येऊन नर्मदा परियोजना विचार मंचाची स्थापना केली. प्रकल्पाची खरी माहिती लोकांसमोर उघड करण्याचा त्यांनी निश्चय केला. (१८ डिसेंबर १९८८).

दि. १८ ऑक्टोबर रोजी गुजरात शासनाने १२ गावांमध्ये गोपनीयता अधिनियम (Official Secrets Act) लागू केला.

१९८९ -

१) दि. ३० जानेवारी रोजी केवडीया व त्याच्या आजूबाजूच्या दहा गावांमध्ये ऑफीशियल सीक्रेट्स् ॲक्टच्या विरोधात निदर्शने करण्यात आली. यामध्ये गुजरात, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील ५०० प्रतिनिधी सहभागी झाले. यापैकी १७ कार्यकर्त्यांना अटक करून त्यांच्यावर खटला दाखल करण्यात आला.

२) त्याच दिवशी, धरण कंत्राटदारांच्या दडपशाही धोरणाचा निषेध म्हणून धरणावर मजुरांनीही बेमुदत संप पुकारला.

३) दि. २२ फेब्रु. रोजी तीन्ही राज्यातील धरण स्थळावर १० हजार धरणग्रस्तांचा मोर्चा धडकला. सर्वांना अटक करण्यात आली. याचे पडसाद मुंबई व मध्यप्रदेशातही उमटले. ठिकठिकाणच्या नागरिकांनी धरणे, सत्याग्रह इत्यादी मार्गांनी विस्थापितांना आपली साथ आणि समर्थन जाहीर केले.

४) दि. २९ मार्च रोजी, धरणाच्या आजूबाजूच्या १० गावांना लागू केलेला काळा कायदा (Official Secrets Act) मागे घेण्यास गुजरात सरकारला भाग पाडण्यात आंदोलन यशस्वी झाले.

५) दि. ४ एप्रिल रोजी विस्थापितांनी, म. प्र. सरकारने धरणाला विरोध करावा या मागणीसाठी विधानसभेसमोर धरणे दिले. १००० लोकांना अटक केली.

६) दि. १६ एप्रिल रोजी राजकोट येथे सरदार सरोवराबद्दल दिवसभराचे चर्चासत्र सौराष्ट्राच्या सर्व भागांतून शंभर प्रतिनिधी त्यामध्ये सहभागी झाले होते. आंदोलनाचे प्रमुख कार्यकर्ते त्यात सहभागी झाले. सरदार सरोवराऐवजी सौराष्ट्रासाठी विकेंद्रित पाणी व्यवस्थापन हवे असा त्यात सूर निघाला.

७) दि. २२ एप्रिल ते २ मे च्या दरम्यान विश्वबँकेच्या पर्यावरण, पुनर्वसन इत्यादी तीन समित्या भारताच्या दौऱ्यावर आल्या. म.प्र. सरकारने पुनर्वसन समितीला राज्यातील गावांमध्ये जाण्यास मनाई केली. मात्र भोपाळमध्येच ६० विस्थापितांनी त्यांना घेराव घालून त्यांच्याशी चर्चा केली. अखेरीस २६ एप्रिल रोजी समिती बडवानीला पोहोचली आणि निरीक्षणान्ती तिने, विस्थापितांचे पूर्ण आणि न्यायपूर्ण पुनर्वसन झाले नाही असे मत त्यांनी नोंदवले.

८) दि. १ मे रोजी पाचशे ट्रक, ट्रॅक्टर आणि मोटारसायकली यांनी मध्य प्रदेशाच्या प्रभावित क्षेत्रात नर्मदेची परिक्रमा केली.

९) दि. ६ व ७ मे रोजी नर्मदा बचावो आंदोलनाने मुंबई येथे दोन दिवसांचे चर्चासत्र आयोजित केले. त्यामध्ये पुढील कार्यक्रमाची दिशा ठरून राष्ट्रीय पातळीवरून समन्वयाची प्रक्रिया सुरू करण्यात आली. देशभरातील प्रकल्पग्रस्त विस्थापित व पर्यायी विकासासाठी काम करणाऱ्या संघटना चळवळी इत्यादींचे हरसूद येथे सप्टेंबर ८९ मध्ये सम्मेलन घेण्याचे ठरले.

१०) दि. १७ जुलै रोजी, सरदार सरोवर प्रकल्पाला कर्ज देणे चालू ठेवण्याच्या विश्व बँकेच्या निर्णयाच्या विरोधात दिल्ली येथील बँकेच्या कार्यालयासमोर विस्थापितांनी धरणे दिले.

११) दि. २८ सप्टेंबर रोजी नर्मदा बचावो आंदोलनाने हरसूद येथे विनाशकारी योजनांच्या विरोधात मेळावा आयोजित केला. त्याला देशभरातील ३५० संघटनांचे ५०,००० आदिवासी शेतकरी व अन्य आणि बिगर आदिवासी प्रतिनिधी उपस्थित होते. त्यामध्ये, देशातील सर्व संघर्ष चळवळींनी परस्परांशी सहयोग व समन्वय साधून विनाशकारी योजनांना विरोध करावा आणि नवीन विकासनीतीची उभारणी करावी असा संकल्प सोडण्यात आला.

१२) दि. २४ ऑक्टोबर रोजी अमेरिकन काँग्रेसच्या कृषि व पर्यावरण उपसमितीच्या निमंत्रणावरून मेधा पाटकर, गिरीशभाई पटेल आणि विजय परांजपे यांनी विश्व बँकेचे दुटप्पी धोरण उघड करण्याच्या दृष्टीने उपसमितीच्या समोर आपले विचार मांडले. त्यानंतर विश्व बँकेच्या कार्यकारी संचालकांच्या बैठकीतही आंदोलनाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

१३) दि. ४ व ५ नोव्हेंबर रोजी देशभरातल्या सरदार सरोवर विरोधी अनेक संघटनांची मुंबई येथे बैठक झाली. नबआँ समन्वय समितीला व्यवस्थित रूप देण्याचा प्रयत्न झाला.

१४) दि. २४ डिसेंबर रोजी सरदार सरोवर धरणाचे कंत्राटदार जयप्रकाश असोशिएट्स् यांच्या ५०० गुंडांनी धरणस्थळाजवळच्या केवडिया या गावावर हल्ला करून लूटमार केली. त्यामध्ये अनेक लोक जखमी झाले.

१५) दि. ३१ डिसेंबर रोजी नर्मदेच्या किनाऱ्यावरील हापेश्वर मंदिरा समोरच्या किनाऱ्यावर दोन हजार आदिवासींचा दिवसभराचा मेळावा होऊन त्यांनी आपले जंगल व जमीन न सोडण्याचा संकल्प केला.

१९९० -

१) दि. १६ जानेवारी रोजी धडगाव (महाराष्ट्र) येथील सरदार सरोवराच्या कार्यालयावर तीनशे आदिवासींनी कब्जा केला व कार्यालय बंद झाले.

२) दि. १७ जानेवारी रोजी केवडिया येथे, कंत्राटदारांच्या दडपशाहीला समाप्त करण्याची मागणी करणाऱ्या पाचशे आदिवासींच्या सभेवर पोलिसांनी लाठीमार केला. त्यामध्ये दोनशे लोकांना अटक करण्यात आली.

३) दि. १८ जानेवारी रोजी बडवानी येथील दोन हजार स्त्रीपुरुष गावकऱ्यांनी धरणाच्या कंत्राटदारांच्या घरावर जाऊन तेथे निदर्शने केली आणि त्यांना कंत्राट सोडून देण्यास सांगितले.

४) दि. ३० जानेवारी रोजी बडवानी येथील पाच हजार शेतकरी-कामगारांनी वाहनांचा मोर्चा काढला. सरदार सरोवराच्या संबंधातील सर्व

कार्यालये त्यांनी बंद पाडली. त्यानंतरही एक महिनाभर रोज वेगवेगळ्या गावांमध्ये जाऊन ते तेथे धरणे देऊन कार्यालये बंद पाडणे चालू राहिले.

५) बाबा आमटे आनंदवनामधून बाहेर पडून दि. ६ मार्च रोजी नर्मदा बचाव आंदोलनात सहभागी झाले. लढाईला पुन्हा जोर आला. या दिवशीच मध्यप्रदेशातील मुंबई आगरा महामार्गावरील खलघाट पुलावर अठ्ठावीस तासांचे चक्का जाम आंदोलन झाले. बाबा आमटेंसह दहा हजार आदिवसींनी त्याच्यात भाग घेतला. सरदार सरोवरामुळे होणारे विस्थापन, आर्थिक लाभ-हानी आणि पर्यावरणीय विनाश यांच्यासह सगळ्याच मुद्यांचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली. मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री सुंदरलाल पटवा यांनी राज्य स्तरावर लोक संघटनांच्या मदतीने असा पुनर्विचार करण्याचे, तसेच केंद्र सरकारकडे या बाबतीत आग्रह धरण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर बाबा आमटे नर्मदा खोऱ्यातच येऊन राहू लागले.

६) दि. २८ मार्च रोजी मुंबईला धरणे देण्यात आले. धरणामुळे जून १९९० मध्ये महाराष्ट्रातील काही गावे पाण्याखाली जातील अशी शंका आल्यामुळे मुंबईच्या विधानभवनाजवळ चारशे आदिवासींनी धरणे दिले. मेधा पाटकर, अरुंधती धुरू, रामा पाडवी आणि केल्याभाऊ वळवी या चौघांनी बेमुदत उपोषण सुरू केले.

दि. ५ एप्रिल रोजी चर्चेनंतर महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी असे कबूल केले की विस्थापनाचा प्रश्न लोकांच्या सहमतीने सुटत नाही तोपर्यंत महाराष्ट्राच्या जमिनीवर पाणी येईल असे कोणतेही बांधकाम ते करू देणार नाहीत. या आश्वासनाने उपोषणाची समाप्ती झाली.

७) दि. ८ एप्रिल रोजी बडवानी व अलिराजपूर येथे शांततापूर्ण धरणे देणाऱ्या शेतकरी-आदिवासी स्त्रीपुरुषांवर घोडेस्वार पोलिसांनी निर्दयपणे लाठीमार केला. अलिराजपूर येथे महिला कार्यकर्त्यांना जबरदस्त मारहाण करण्यात आली. बडवानी मध्ये २०० लोकांना अटक करण्यात आली. या प्रकरणाचा, जाहीर सभा बोलावून निषेध करण्यात आला. बडवानी आणि आसपासच्या भागात १४४ वे कलम लागू करण्यात आले. बाबा आमटे यांनाही अटक करण्यात आली.

८) दि. १६ ते २० एप्रिलच्या दरम्यान दिल्लीमध्ये गावातल्या दीडशे प्रतिनिधींनी धरणे दिले. केंद्रीय समाजकल्याणमंत्री, वित्तमंत्री इत्यादींना निर्वाणीचा इशारा देण्यात आला - "धरणाचे काम बंद करा."

९) दि.१४ ते १८ मे च्या दरम्यान दोन हजार आदिवासी शेतकऱ्यांनी दिल्ली येथील पंतप्रधानांच्या घराजवळ ठाण मांडले. बाबा आमटेही त्यांच्याबरोबर होते. पंतप्रधानांना निर्वाणीचा इशारा देण्यात आला. दि. १७ मे रोजी पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंह यांनी सर्व आंदोलकांना त्यांच्या घरी बोलावून त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. बांधकाम थांबवण्याची आणि ताबडतोब पुनर्विचार सुरू करण्याची मागणी मान्य करण्याची त्यांनी असमर्थता व्यक्त केली मात्र विवादास्पद मुद्यांच्या बाबतीत ताबडतोब चर्चा सुरू केली जाईल असा त्यांनी प्रस्ताव मांडला. पुनर्विचाराच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल समजून आंदोलकांनी हा प्रस्ताव मान्य केला. दि. १८ मे रोजी आंदोलकांच्या प्रतिनिधींनी वेगवेगळ्या मंत्रालयांच्या सचिवांशी विस्ताराने चर्चा केली. दि. २२ मे रोजी गुजरात सरकारने धरणे दिले, ज्यामध्ये खुद्द मुख्यमंत्रीही सामील झाले होते. पुढे नोकरशहांनी ही पुनर्विचाराची प्रक्रियाच बंद पाडली.

१०) दि. १४ ते १९ मे रोजी अलिराजपूरच्या दहा प्रभावित गावांमध्ये सशस्त्र पोलिसांनी, धरणासाठी करावयाच्या सर्वेक्षणाला विरोध करणाऱ्या गावकऱ्यांवर लाठी आणि बंदुकीच्या दस्त्याने प्रहार केले. यांच्यामध्ये गर्भवती महिलेचाही समावेश होता.

११) दि. ७ जून रोजी आंदोलनाला विरोध करण्यासाठी मुंबई येथे गुजरात सरकार, उद्योगपती आणि व्यापारी यांचा एक लाखांवरचा मोर्चा. कच्छी व्यापाऱ्यांनी याला साह्य केले. सरदार सरोवर कच्छला पाणी देणार हे त्यांना त्यावेळी वाटत होते.

१२) दि. २१ जून रोजी, आंदोलनाच्या बाबतीत मध्यप्रदेशच्या पटवा सरकारने केलेली दडपशाही आणि खोटा प्रचार यांच्या विरोधात आंदोलकांच्या प्रतिनिधींनी भोपाळ येथे धरणे दिले.

१९९०-९१ -

१३) जनविकास संघर्ष यात्रा - नर्मदा खोऱ्यातील सुमारे सहा हजार आदिवासी शेतकऱ्यांची ''जनविकास संघर्ष यात्रा'' (लॉंगमार्च) हजारो गावकरी बडवानी (निमाड) येथून स्वतःचे सामान ट्रॅक्टर, बैलगाड्यांवर लादून धरणस्थळी सत्याग्रह करण्यासाठी २५ डिसेंबर १९९० साली निघाले. वाटेत गावागावात त्यांचे स्वागत झाले. पडाव टाकले, सभा झाल्या. गुजरात सरकारने या अहिंसक सत्याग्रहाला प्रचंड पोलिसी बळाने व अपप्रचार, प्रांतीयवाद इत्यादींनी अडवायचे ठरवले. गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांनी दहा हजारावर पोलिस व सुरक्षा जवान मध्यप्रदेश-गुजरात सीमेवर तैनात केले होते. गुजरातेत व्यापारी-धर्ममार्तंड व प्रतिगामी शक्तींशी राजकारण्यांनी हात मिळवणी करून आंदोलनाच्या विरुद्ध उन्माद पैदा करण्याचा प्रयत्न केला. सीमेवरच हजारो सत्याग्रहींना कडाडत्या थंडीत उघड्यावर मुक्काम केला. 'संघर्ष गांव'! - ७ जानेवारी १९९१ पासून मेधा पाटकर, शांताबहन, देवरामभाई, खाज्या पावरा, मथुरभाई, मेघनाथ यांनी धरणाचा संपूर्ण पुनर्विचार व्हावा या मागणीसाठी बेमुदत उपोषण सुरू केले. पुनर्वसनाच्या प्रश्नावर लोकांसमोर चर्चा करावी असे आह्वान सरकारांना केले. गुजरात सरकारचे दमनचक्र सुरूच राहिले. शेवटी जागतिक बँकेने आपल्या इतिहासात प्रथमच कोणत्याही बँक-आलंबित प्रकल्पाचा पुनर्विचार करण्याचे जाहीर केले. २८ जानेवारीस हे २२ दिवसांचे उपोषण संपले. ३० जानेवारीस लोक नर्मदा खोऱ्यात परत निघाले.- ''शासनवालो सुन लो आज - हमारे गांव में हमारा राज'' या निर्धाराने.

१९९०-९१ -

१) ऑगस्ट १९९१ मध्ये मणिबेली हे गाव पाण्याखाली जाणार होते. आंदोलकांनी तसेच गावकऱ्यांनी तेथे ''आम्ही जलसमाधी घेऊ पण येथून हटणार नाही'' अशी भूमिका घेऊन सत्याग्रह केला. ''डूबेंगे पर नहीं हटेंगे'' या निर्धाराने अहिंसक सत्याग्रहाची व्याप्ती वाढवली. या वेळी ६३ लोकांना अटक करण्यात आली. सत्याग्रहाचा परिणाम म्हणून काही काळ धरणाचे काम ३२ मीटर्सवर स्थगित राहिले.

१९९२ -

१) दि. ३ मार्च रोजी, मालू येथे पुनर्वसन झालेले गुजरातेतील विस्थापित लोक तेथील जमिनीच्या व जीवनावश्यक सुविधांच्या अभावामुळे पुनर्वसन स्थळ सोडून त्यांच्या वडगाव या मूळ गावी परत आले.

२) दि. २६ मार्च व २३ एप्रिल रोजी ५०० पोलीस बंदुका, बुलडोझर व ट्रक घेऊन मणिबेलीत शिरले व त्यांनी गावकरी व कार्यकर्त्यांना अटक केली.

विश्व बँकेने सरदार सरोवराचे पुनरीक्षण करण्यासाठी नियुक्त केलेल्या श्री मोर्स यांच्या अध्यक्षतेखालील समितीने जून महिन्यात तिचा अहवाल सादर केला. त्यामध्ये, विश्व बँकेने सरदार सरोवराला मदत देऊ नये असे परखड मत मांडले होते. हा विजय साजरा करण्यासाठी आंदोलकांनी कसरावद येथे एक मोर्चा काढला.

१९९३ -

१) दि. १ जानेवारी रोजी महाराष्ट्र पोलीस आणि प्रशासनाने मणिबेली आणि इतर गावांमध्ये जंगल तोडून रस्ते बनवण्याचा जबरदस्तीने प्रयत्न केला. त्याचा विरोध करणाऱ्या दोनशे गावकऱ्यांना अटक करण्यात आली. यामध्ये महिला व बालकांचाही समावेश होता. न्यायालयीन आदेशांचेही उल्लंघन करण्यात आले. पोलिसांच्या या आक्षेपार्ह कृतीच्या विरोधात मेधा पाटकर यांनी पाच दिवसांचे उपोषण केले. पण उपयोग झाला नाही. पोलीस आणि बुलडोझर पुन्हा गावातील जंगले कापून रस्ते बांधणीच्या तयारीला लागले.

२) दि. ३० जानेवारी ते ५ मार्च च्या दरम्यान एक अभिनव मोहीम काढण्यात आली. 'लोक निवाडा.' आंदोलनकर्त्या गावांमध्ये जाऊन लोकांचा निर्धार पडताळून पाहणे आणि लढाई पुढे चालू ठेवण्यासाठी त्यांना प्रेरणा देणे हा या मोहिमेचा उद्देश होता. यासाठी गावोगावी जाऊन लोकांची मते विचारण्यात आली.

३) दि. ४ एप्रिल रोजी बुडीत क्षेत्रामधील अंत्रास (गुजरात) या गावातील बुधीबेन या आदिवासी कार्यकर्त्या स्त्रीवर पोलिसांनी बलात्कार केला.

४) दि. २८, २९ जानेवारी आणि दि. १,२ फेबुवारी रोजी अंजनवाडा कांड घडले. मध्य प्रदेश पोलिसांनी अंजनवाडा (जि. झाबुआ) येथील आदिवासींवर अत्याचार केले. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. न्यायालयाने, अत्याचारांचे गांभीर्य लक्षात घेऊन, सर्व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश दिले. त्यानंतर ऑगस्टमध्ये सी. बी. आय. मार्फत तपासणीचा आदेशही देण्यात आला.

५) दि. ३० मार्च रोजी विश्व बँक सरदार सरोवर प्रकल्पामधून मागे हटली. तिने धरणासाठी यापुढील कर्ज द्यायचे नाकारले. नर्मदा खोऱ्यातील जनसंघर्षाचाच हा विजय होता. पुनर्वसन आणि पर्यावरण यांच्या बाबतीत प्रकल्पाची समाधानकारक स्थिती नसल्यामुळे अशा प्रकल्पाला आर्थिक मदत दिल्यामुळे बँक जागतिक पातळीवर अडचणीत सापडण्याची शक्यता होती. या कारणामुळे बँकेला माघार तर घ्यायची होतीच, परंतु भारत सरकारलाही आपली प्रतिष्ठा वाचवण्याची संधी देण्यात आली आणि भारताने त्या कर्जातून माघार घेतली. आता धरण आर्थिक संकटातच सापडले होते.

६) पावसाळी सत्याग्रहाच्या पूर्वीच दि. २९ मे ते १० जून या दरम्यान मणिबेली आणि महाराष्ट्राच्या इतर गावांमध्ये पोलिसांची दडपशाही सुरू झाली. लोकांना दहशत बसविण्यासाठी जवळपास ७०० ते ८०० पोलिस माणिबेली व जवळपासच्या परिसरात ठाण देऊन होते. मणिबेलीतील पहिले (केशुभाईचे) घर दि. ३ जून रोजी तोडण्यात आले. दि. ८ जून रोजी नर्मदाई तोडण्यात आले. अनेक लोकांना अटक झाली. दि. ३ जून पासून मुंबईत धरणे देऊन मेधा पाटकर आणि देवराम भाई यांनी बेमुदत उपोषण सुरू केले. दि. ११ जून रोजी मुंबई व महाराष्ट्रातील अनेक लोकसंघटनांनी आणि विशेषतः आदिवासी-कामगार यांच्या संघटनांनी मोठी सभा घेतली. राजकीय पक्षांनीही या विषयावर प्रथमच पुनर्विचाराची मागणी केली. त्यानंतर दि. १२ जून रोजी केंद्रीय जल संसाधन मंत्र्यांनी स्वतःच पुढाकार घेऊन धरणाचा पुनर्विचार

करण्याचा प्रस्ताव ठेवला. त्यानंतर त्यावर वाद-चर्चा होऊन, दि. १७ जून रोजी त्यांच्याकडून अशा पुनर्विचाराचे ठोस आश्वासन देण्यात आले व त्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

७) दि. २९, ३० जून रोजी पुनर्विचाराच्या प्रक्रियेला ठोस रूप देण्यासाठी शासनाने पहिली बैठक बोलावली. तीमध्ये केंद्र शासन, महाराष्ट्र व मध्य प्रदेश ही राज्य शासने यांचे प्रतिनिधी आले होते. तसेच न्या. कृष्ण अय्यर, प्रो. उपेंद्र बक्षी, ठाकुरदास बंग, डॉ. लक्ष्मीचंद जैन यांच्या सारख्या निष्पक्ष मान्यवर व्यक्तीही उपस्थित होत्या. आंदोलनाने धरणाचा पूर्णतः पुनर्विचार करण्याची मागणी केली. शेवटी धरणाच्या सगळ्या पैलूंचा पुनर्विचार करण्यासाठी निष्पक्ष मान्यवरांची समिती नियुक्त करण्याचा निर्णय होऊन बैठक समाप्त झाली.

दि. ११ ते १६ जुलै दरम्यान नर्मदा खोरे हळूहळू पाण्याखाली येऊ लागले. दि. ११ जुलैला पहिले घर बुडले. वडगाम येथील भुलाभाई तडवींचे घर बुडले. नंतर सारे वडगाम (गुजरात) पाण्याखाली गेले. आदिवासींचे श्रद्धास्थान असलेले शूलपाणीश्वर मंदिरही बुडाले. १६ जुलैच्या रात्री महाराष्ट्रातील मणिबेली गावातही पाणी आले परंतु लोक हटले नाहीत. 'डूबेंगे पर नहीं हटेंगे' च्या घोषणा देत ते कमरे इतक्या पाण्यातही निर्धाराने उभे होते. त्यांनी आपले धान्य, भांडी, सामान काहीच हलविले नाही. त्यावेळी पोलिसांनी जबरदस्तीने त्यांना अटक केली.

दि. २२ ते २८ जुलै पर्यंत खोऱ्यातील शेकडो स्त्री पुरुषांनी बाबा आमटे यांच्यासह दिल्लीत राजघाट जवळ सात दिवसांचे धरणे दिले. बेकायदेशीरपणे होणाऱ्या या बुडीताच्या विरोधात उभे ठाकण्यासाठी त्यांनी जलसमर्पणाची घोषणा केली.

दि. १७ जुलै रोजी मेधा पाटकर व त्यांच्या सहकाऱ्यांनीही 'जलसमर्पण' करण्याची घोषणा केली. ही वार्ता देशभर पसरली. आंदोलनाचे देशभरामधील समर्थक, सामाजिक व राजकीय संघटना आणि इतर नामांकित व्यक्ती यांनी एकत्र येऊन हे टाळण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

दि. ५ ऑगस्ट रोजी केंद्र सरकारने लोकांच्या दबावामुळे, सरदार सरोवराचा पुनर्विचार करण्यासाठी ५ सदस्यांची समिती नियुक्त केली. (जयंत पाटील) त्यामुळे ६ ऑगस्टचे जलसमर्पण स्थगित झाले.

आंदोलनाचे सर्व मुद्दे वारंवार सिद्ध होऊन व सरकारतर्फे धरणासंबंधी पुनर्विचाराचे आश्वासन मिळूनही त्यावर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने शेवटी 'जलसमर्पणा'चा निर्णय जाहीर करण्यात आला. हा राजकीय दबावाचा प्रयत्न नव्हता, मात्र आंदोलनाच्या निर्धाराला प्रत्यक्षात आणण्याचा हा प्रयास होता. अहिंसक जनआंदोलनात हिंसेच्या ऐवजी स्वतःच्या जीवाचेच हत्यार बनवून आपले येय न सोडण्याचा हा निर्धार होता. 'जलसमर्पणा'च्या निर्णयाने देशभरातील संघटना, चळवळी, मान्यवर व्यक्ती यांनी धरणाच्या पुनर्विचारासाठी सरकारवर दबाव आणला.

दि. २७ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर च्या दरम्यान अमरकंटक पासून तर कच्छ पर्यंत नर्मदा जन जागरण यात्रा काढण्यात आली. नर्मदा खोऱ्यातल्या इतर धरण प्रकल्पांच्या क्षेत्रात संपर्क, संवाद व काम सुरू करण्यात आले.

दि. १९ नोव्हेंबर रोजी चिचखेडी बारी येथील पोलीस गोळीबारात रेहमल पुनिया वसावे (वय-१५ वर्षे, गाव-सुरुंग) याचा मृत्यु झाला. दि. २२ नोव्हेंबर रोजी धुळे येथील पोलिसांनी केलेला गोळीबार आणि त्यामुळे झालेला रेहमलचा मृत्यु याच्या निषेधार्थ करण्यात आलेल्या निदर्शनांवर पोलिसांनी पुन्हा निर्दयपणे लाठीमार केला. त्यामध्ये २५० लोक जखमी झाले. त्यापैकी १२६ लोकांना रुग्णालयात दाखल करावे लागले.

दि. ९ ऑक्टोबर रोजी अहमदाबाद येथील दलित संघटनांनी सरदार सरोवर प्रकल्पाला आपला विरोध जाहीर केला. आंदोलनाच्या समर्थनार्थ भाजपा-काँग्रेसचा विरोध पत्करून अहमदाबादेत जाहीर सभा घेतली.

दि. २९ डिसेंबर : सरदार सरोवर प्रकल्पाला मंजुरी देतेवेळी पर्यावरण मंत्रालयाने घातलेल्या शर्तींचे उल्लंघन करण्यात आले असून पुनर्वसन आणि पर्यावरणाच्या योजना बऱ्याच मागे असल्याचे नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या पर्यावरणीय उपसमितीने मान्य केले.

दि. ३१ डिसेंबर रोजी नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाची एक सर्वसाधारण बैठक घेण्यात आली. त्यामध्ये पर्यावरणाच्या आणि पुनर्वसनाच्या शर्ती पूर्ण न झाल्यामुळे जलद्वार बंद करण्यास तसेच धरणाचे काम पुढे चालू ठेवण्यास मंजुरी देण्यात आली नाही.

१९९४ -

दि. ४ जानेवारी रोजी केंद्रीय जल संसाधन विभाग आणि पर्यावरण विभाग यांच्या आदेशावरून नदीच्या पात्रातील प्रत्यक्ष धरणाचे बांधकाम स्थगित.

दि. १२ जानेवारी रोजी नर्मदेच्या मुद्यावर स्वतः पंतप्रधानांनी दुसऱ्यांदा राज्याच्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावली. धरणाचे बांधकाम ६७ मीटर्स इतकेच ठेवण्याचा आदेश देण्यात आला. राजकीय दबावामुळे अक्कलकुवा तालुक्यातील १५०० हेक्टर्स जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला.

दि. ३१ जानेवारी रोजी महाराष्ट्रातील अक्राणी तालुक्यातील गावांमध्ये जंगल भुईसपाट करून तेथे रस्ते बांधण्याच्या विरोधात शांततापूर्ण निदर्शने करणाऱ्या गावकऱ्यांवर पोलिसांनी हल्ला केला. ज्यामध्ये अनेक कार्यकर्त्यांना मारझोड आणि ६५ स्त्रीपुरुषांना अटक करण्यात आली.

दि. २३ फेब्रुवारी रोजी, नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या आदेशांना पायदळी तुडवून धरणाची जलद्वारे (स्लुईसेस) बंद करण्याची एकतर्फी कारवाई सुरू करण्यात आली.

दि. २४ फेब्रुवारी रोजी गुजरात उच्च न्यायालयाने, धरणाची उंची वाढवण्याच्या कोणत्याही कारवाईवर स्थगिती आणली. तरीही लोखंडी जलद्वारे उघडली गेली नाहीत की काम बंद झाले नाही.

दि. २० मार्च रोजी रात्री २ वाजता, काँग्रेस व भाजपाच्या गुंडांनी आंदोलनाच्या बडोदा येथील कार्यालयावर हल्ला केला. पुस्तके, फायली, कागदपत्रे व अन्य सामानाची नासधूस केली. कार्यकर्त्यांना गुजरात सोडण्याची धमकी देण्यात आली. दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा हाच प्रकार घडला.

दि. १ ते १० एप्रिल मध्ये विस्थापितांच्या लढाईला आकार देण्यासाठी आणि मध्य प्रदेशात होणाऱ्या बुडिताचा सामना करण्यासाठी लोकांची साथ आणि समर्थन मिळवण्याच्या उद्देशाने दोन वेगवेगळ्या यात्रांचे आयोजन करण्यात आले.

दि. १९ एप्रिल रोजी दिल्ली येथे, पावसाळ्याच्या आधी पंतप्रधानांना इशारा देण्यासाठी आलेल्या १००० प्रकल्पबाधित लोकांनी बेमुदत धरणे दिले. पंतप्रधान नरसिंहराव यांनी लोकप्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेतले. काही बोलले नाहीत. ''पहले मैं जान लूंगा'' एवढेच म्हणाले.

दि. २० जुलै रोजी पांच सदस्यीय (जयंत पाटील) समितीचा अहवाल अखेर केंद्र सरकारला सादर केला. त्यात आंदोलनाच्या अनेक मुद्यांची सत्यता अप्रत्यक्ष रीतीने कबूल केली आहे व धरणाच्या विस्थापन, लाभ-हानी, तांत्रिक पर्यावरणीय बाबींसंबंधी अनेक शंका प्रकट केल्या. गुजरातच्या काही धरणसमर्थकांनी हा अहवाल प्रसिद्ध होऊ नये म्हणून गुजरात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. ती सर्वोच्च न्यायालयात वर्ग करून घेतली गेली. त्यावर डिसेंबरात न्यायालयाने निर्णय दिला. त्याच बरोबर न्यायालयाने हा अहवाल परिपूर्ण नाही, ''समितीला जे सांगायचे ते सांगितले गेले नाही'' असे म्हणून पुन्हा दुसरा अहवाल देण्यास फर्मावले. त्यात नदीत किती पाणी (), धरणाची उंची, पर्यावरणीय पैलू, विस्थापन या चार मुद्यांवर विशेष जोर दिला. जयंत पाटील यांनी समितीचा राजीनामा दिला. तरी काम जारी राहिले. हा दुसरा अहवाल १९९५ मध्ये न्यायालयात दिला गेला. हा अहवाल न्यायालयाने १९९८ पर्यंतच्या सुनावणीत महत्त्वाचा मानला होता.

मे ११९९४ मध्ये नर्मदा बचावो आंदोलनाने सरदार सरोवर प्रकल्पाला सर्व मुद्द्यांवर विस्थापन, लाभ हानी पर्यावरणी, आर्थिक, लाभाचे दावे, पर्याय इ.) आह्वान देणारी व्यापक जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. सरदार सरोवर धरणाचे काम थांबवून त्याचा पुनर्विचार व्हावा, विस्थापन व धरणाचे प्रत्यावर्ती नसलेले सर्व काम थांबवावे अशी मागणी करण्यात आली.

ऑक्टोबर १९९४ - धरणाची उंची ६१ मीटरच्या गेल्यावर नर्मदा खोऱ्यातील हजारो जणांनी मध्य प्रदेश सरकारने यापुढील धरणाचे काम थांबवावे म्हणून भोपाळ मध्ये धरणे धरले.

नोव्हेंबर २१ पासून पुन्हा याच कारणासाठी धरणे धरले. पुनर्वसन झाले नसताना व ते होणे शक्यही नसताना मध्य प्रदेश सरकारने धरण बांधून बुडीत आणू नये या मागणीसाठी मेधा पाटकर, सीताराम भाई, लुवारिया भाई, शांताबहन यांनी बेमुदत उपोषण सुरु केले.

१३ डिसेंबर १९९४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने पाच सदस्यीय समितीचा (जयंत पाटील) अहवाल खुला केला. त्यावर सर्व न्यायाधिकरणाच्या शर्तीबाहेरही टिप्पणी द्यायला मुभा दिली.

१६ डिसेंबर - याचा आधार घेऊन मध्यप्रदेश चे मुख्यमंत्री दिग्विजयसिंह यांनी विधानसभेत घोषित केले की "आता खुद्द सर्वोच्च न्यायालयाने सरदार सरोवराचा मुद्दा पुन्हा खोलला आहे. तेव्हा, मध्यप्रदेश न्यायाधिकरणाच्या पुनर्विचाराची मागणी न्यायालयासमोर ठेवेल. धरणाचे काम बंद ठेवण्याची मागणी करेल. यानंतर सर्व कार्यकर्त्यांचे २२ दिवसांचे उपोषण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विसर्जित केले गेले.

डिसेंबर महिन्याच्या शेवटी नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या बैठकीत मध्यप्रदेशाने धरणाचे काम बंद करण्याची मागणी केली त्यानुसार जानेवारी १९९५ पासून धरणाचे नदीपात्रातील काम थांबले.

१९९५ -

(१) मे महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने धरणाच्या कामाची ८०.३ मी. वरील स्थगिती कायम ठेवली.

१९९७ -

१) दि. ५ जुलै रोजी पुनर्वसन स्थळी राहायला गेलेले गुजरातमधील प्रकल्पबाधित लोक ते ठिकाण सोडून त्यांच्या मूळ गावी मुखडी येथे आले.

२) दि २५ एप्रिल रोजी नर्मदा घाटी संघर्ष समन्वय समितीने महेश्वर येथे मोठ्या धरणांच्या विरोधात मेळावा केला.

३) दि. ६ जून रोजी तवा, बर्गी, गोई, वेदा, महेश्वर, सरदार सरोवर या साऱ्यांच्या विरोधात संयुक्तपणे निदर्शने करून आंदोलकांनी नर्मदा खोरे विकास प्राधिकरणाच्या (Narmada Valley Development Authority) भोपाळमधील कार्यालयाला घेराव घातला.

४) दि. २१ सप्टेंबर रोजी प्रकल्प बाधित लोकांनी धरणस्थळाच्या जवळील केवडीया कॉलनीवर धरणे दिले. १७-१९ डिसेंबर, १९९७ दरम्यान, नबआंच्या प्रयत्नांतून मध्यप्रदेश सरकारने नर्मदा खोऱ्यातील प्रकल्प समीक्षा व पर्याय असा परिसंवाद भोपाळमध्ये ठेवला. त्यात प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी, नबआं कार्यकर्ते, अनेक तज्ज्ञ, सरकारी अधिकारी, मंत्री सहभागी झाले. त्यातील विचारमंथनानंतर एकंदरच नर्मदा खोरे प्रकल्पाविषयी व पर्यायाविषयी विचार करण्यासाठी राज्य सरकार, आंदोलन व तज्ज्ञांचे संयुक्त कार्यदल (टास्क फोर्स) नियुक्त करण्याचा निर्णय झाला.

१९९८ -

१) दि. ११ जानेवारी रोजी, महेश्वर धरणाचा पुनर्विचार करण्यात यावा आणि तोपर्यंत धरणाचे काम थांबवावे या मागणीसाठी पंचवीस हजार लोकांनी महेश्वर धरणाच्या जागी धरणे दिले. देशातील हा पहिला प्रमुख खासगी जलविद्युत प्रकल्प असेल. त्यात ७६% भांडवल गुंतवणूक बहुराष्ट्रीय कंपन्यांची आहे.

२) सरदार सरोवरासंबंधी जनहित याचिका दाखल केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने त्याच्याकडून संपूर्ण धरणाचा तसेच न्यायाधिकरणाने जे निर्णय दिले आहेत त्यांचाही फेरविचार करावयाचा होता, परंतु या बाबी सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारकक्षेत येतात किंवा कसे याबाबत शंका उपस्थित केल्यामुळे तो विषय स्वतंत्र सांविधानिक पीठाकडे (Constitutional bench) सोपविण्यात आला त्या पीठाकडूनच त्या मुद्याची तड लावून, नंतर सर्व मुद्द्यांवर सुनावणी होणे अपेक्षित होते. त्यातून सामाजिक हित साध्य झाले

असते. परंतु तसे झाले नाही. वर्ष १९९८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने तो विषय स्वतंत्र संविधानिक पीठाकडून थेट अंतिम सुनावणीला सुरुवात केली. तीही फक्त पुनर्वसनाच्या मुद्यांवर.

१९९९ -

२) दि. २७ जानेवारी रोजी अंतिम सुनावणीला सुरुवात झाली. नर्मदा बचाव आंदोलनाने सरदार सरोवर प्रकल्पाशी संबंधित सर्व बाबींवर आपली बाजू मांडली. त्यावर गुजरात व केंद्र सरकार अडीच दिवस आणि सरकारी वकीलांनी सात दिवस चर्चा केली. सरकारच्या बाजूने हरीश साळवे यांनी युक्तिवाद केला. त्यामध्ये साळवे असे म्हणाले की धरणाचे काम सुरू असेल तरच परकीय मदत किंवा कर्ज मिळेल असा स्पष्ट संदेश न्यायालयाने बाहेरच्या जगाला दिला तरच लोक आपापल्या गावांमधून बाहेर पडतील. न्यायालयाने ही गर्भित धमकी ऐकून घेतली व तसाच निर्णय दिला. नबआं ने म्हटले की न्यायालयाला काही संदेशच द्यायचा असेल तर हे न्यायालय पददलितांच्या हक्काचे रक्षण करणारे असा संदेश दिला जावा. पुनर्वसनाचा संपूर्ण आढावा घेणारा अहवाल न्यायालयाला नबआंने सादर केला.

३) दि. १८ फेब्रुवारीला सर्वोच्च न्यायालयाने नदीपात्रातील सांडव्याचे काम सुरू करण्याचे व धरणभिंत तेव्हाच्या ८०.३ मीटर्स उंचीवरून ८५ मीटर्स इतक्या उंचीपर्यंत वाढवण्याचे अंतरिम आदेश दिले. त्याच बरोबर गुजरात सरकारनेही पुनर्वसनाची समीक्षा करण्याकरिता तक्रार निवारण प्राधिकरण स्थापन करण्यास परवानगी दिली. निवृत्त न्यायमूर्ती श्री. पी. डी. देसाई यांना प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले. हे प्राधिकरण दि. ९ एप्रिल रोजी पुनर्वसनाचा अंतरिम अहवाल सादर करील असे ठरले. धरणाची उंची ९० मीटर्सपर्यंत वाढवयाची किंवा कसे ते त्या अहवालाच्या आधारावर ठरणार होते. धरणाची अंतिम उंची किती असावी ( १३९ मी./४५५ मी.) किंवा किती उंची ठेवल्याने फायदे-तोट्यांचे इष्टतमीकरण होईल याबाबत न्यायालयाने काहीही भाष्य केले नाही. त्यानंतर त्यावर ३ मीटर्सचे हंपस् (रोधक) उभारण्यास परवानगी दिली. म्हणजे एकंदर उंची ८८ मीटर्स होते.

धरणाची उंची ८५ मीटर्स इतकी असल्यास महाराष्ट्रातील ३३ व मध्यप्रदेशातील २५ गावे पाण्याखाली जाणार आहेत. त्यामुळे सुमारे १५०० ते २००० कुटुंबे (अंदाजे एक लाख लोक) विस्थापित होणार आहेत. एवढ्या लोकांच्या पुनर्वसनाकरिता आज पुरेशी जमीन उपलब्ध नाही. सध्या ८०.३ मीटर्स इतकी उंची असतानाच वडगाव, मोखडी, मणिबेली ही गावे पाण्याखाली येत आहेत आणि त्यांच्या पुनर्वसनाची अजून सोय झालेली नाही. मग धरणाची उंची ८५ मीटर्स पर्यंत वाढल्यानंतर बुडीत क्षेत्रात येणाऱ्या सुमारे एक लाख गावकऱ्यांचे काय होणार ही कल्पनाच करवत नाही. अशा रीतीने पुनर्वसनाची सोय होण्यापूर्वीच धरणाची उंची वाढवण्याचा आदेश देणे हे न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येते ही आश्चर्याचीच गोष्ट नव्हे काय?

गुजरात सरकारच्या वकिलाने न्यायालयात असा युक्तिवाद केला की न्यायालयाची कक्षा फक्त पुनर्वसनापर्यंतच मर्यादित आहे. विस्थापन, त्याचे औचित्य व प्रक्रिया या गोष्टी न्यायालयीन कक्षेच्या बाहेरच्या आहेत. वास्तविक सरदार सरोवराशी संबंधित सर्व पैलूंचा पुनर्विचार व्हावा म्हणून जनहित याचिका दाखल करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात असा पुनर्विचार होण्याच्या ऐवजी न्यायालयाने आपल्याच कार्याची आणि अधिकाराची कक्षा मर्यादित करून घेतली. नर्मदा बचाव आंदोलनाने आपल्या चौदा वर्षांच्या कार्यकाळात वेगवेगळ्या विषयाच्या तज्ज्ञांकडून सांगोपांग अभ्यास करवून घेऊन त्या आधारे विकास योजनेच्या तांत्रिक, आर्थिक, पर्यावरणीय, सांस्कृतिक तसेच लाभ हानिविषयक पैलूंवर प्रकाश टाकला होता. त्याचप्रमाणे, आंदोलनाने मांडलेल्या सर्व मुद्द्यांवर पुनर्विचार करण्याच्या दृष्टीने नवे न्यायाधिकरण स्थापन करण्याचीही मागणी केली होती.

१९९८ मध्ये टास्कफोर्सची नियुक्ती झाली. त्यातील चर्चेतून (१९९९) शिफारस आली की बांधकाम सुरू असलेल्या सरदार सरोवर, नर्मदासागर व महेश्वर या धरणांसहित संपूर्ण नर्मदा खोरे विकास प्रकल्पांचा पुनर्विचार केला जावा. तसेच विकेंद्रित, स्थानीक गरजांची पूर्ती, पर्यावरणीय निरंतरता व कमीत कमी विस्थापन या सहितच लोकांच्या सहमतीने व सहभागाने कोणतेही जल व भूमी व्यवस्थापन व्हावे.

मार्च १९९९ मध्ये मध्य प्रदेश सरकारने नवीन न्यायाधिकरण स्थापन करण्याची मागणी घेऊन न्यायालयात दावा दाखल केला. सोबतच, ८५ मी. उंची वाढवण्यासाठी दिलेली परवानगी रद्द करा अशीही मागणी केली.

मार्च ६-७ - आंदोलनाने तीन्ही राज्यांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली, तीमध्ये सरकारने न्यायालयाला पुनर्वसनाबद्दल खोटी माहिती दिल्यावरून, सरकारविरुद्ध संघर्ष करण्याचा निर्णय घेतला गेला.

मार्च १५, महाराष्ट्रातील शेकडो आदिवासी स्त्री-पुरुषांनी नंदुरबार येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे देऊन तेथील अधिकाऱ्यांना पुनर्वसनाकरिता जमीन दाखवण्याचे आवाहन केले. त्यावर त्यांनी असे उत्तर दिले की ५ जागांपैकी एकाच जागेवर पुनर्वसन होऊ शकेल. तरीही ती एक जागा पाहण्याचा आदिवासींनी आग्रह धरला. शेवटी अधिकारी त्या लोकांना ठरवलेल्या जागी घेऊन गेले. तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की त्या जमिनीवर आधीपासूनच काही लोक राहत असून त्यांनीच त्या जमिनीवरील मालकीचा दावा केला आहे. हे पाहून शेवटी पुनर्वसनासाठी जमीन उपलब्ध नाही हे, उपजिल्हाधिकारी श्री वसावे यांना नाईलाजाने कबूल करावे लागले. मात्र महाराष्ट्र सरकारने पुन्हा न्यायालयात उलटच बाजू मांडली. आंदोलनावरच आरोप केले.

एप्रिल १ मूलभूत हक्कांसाठी बडवानीहून 'मानव अधिकार यात्रा' काढण्यात आली. मध्यप्रदेश व महाराष्ट्र या राज्यांमधून परिक्रमा करून ती यात्रा मुंबईला विसर्जित झाली. आम्हाला (प्रकल्प बाधित आदिवासींना) जगण्याचा मूलभूत हक्क नाही काय आणि तो नसेल तर आम्ही जगावे तरी कसे? हा प्रश्न विचारण्यासाठी राज्य सरकारकडे दिल्ली येथील केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयातही त्यांनी त्यासाठी दाद मागितली.

जून २० ते ऑक्टोबर १२ यावर्षी वाढलेल्या बांधकामामुळे जास्त गावे, जमिनी, घरे बुडणार त्याचा निषेध व आपला न हटण्याचा निर्धार प्रत्यक्षात आणण्यासाठी २० जून १९९९ पासून डोमखेडी (महाराष्ट्र) व जलसिंधी (म.प्र.) या गावांत डूबेंगे पर नहीं हटेंगेच्या निर्धाराने बुडिताविरुद्धचा सत्याग्रह सुरू झाला. महाराष्ट्र व मध्यप्रदेशातील सर्वच आदिवासी गावांतील

स्त्री-पुरुष, निमाडमधील शेकडो लोक व भारतातील सर्व भागातून अनेक संघटनांचे शेकडो कार्यकर्ते त्यासाठी आले होते. ४ ते ११ जुलै दरम्यान सात सत्याग्रहींनी उपोषण केले.

११ जुंलै - उपोषण सोडताना मेधा पाटकरांनी सर्व समर्पित सत्याग्रहींच्या वतीने आंदोलनाचा आढावा घेतला व जाहीर केले की इतक्या वर्षाच्या सततच्या संघर्षानंतर व आंदोलनाने पुढे आणलेल्या गंभीर मुद्द्यांची पुष्टी झाल्यावरही, लोकांच्याही अधिकाराची, देशाच्या लाभ हानीची व मूलभूत सवालांची दखल न घेताच जर धरणाचे काम यापुढे चालू केले गेले तर त्यांच्यासहित त्यांचे साक्षीदार 'जलसमर्पण' करतील.

१०-११ ऑगस्ट - धरणामुळे वाढणारे पाणी डोमखेडीतील सत्याग्रही झोपडीत शिरले. सर्व सत्याग्रही ठाम होते. समर्पण दलाचे मेधा पाटकर, राण्याभाऊ व देवराम भाई कमरेइतक्या पाण्यातही उभे होते. त्यांच्याबरोबर इतरही गावकरी होते. संध्याकाळ नंतर पाणी थांबले तरी पोलिसांनी शेकडोंना अटक केली.

१८-१९ सप्टेंबर - पुन्हा एकदा पाणी भयानक वेगाने चढत होते. यावेळी सत्याग्रही डोमखेडी, पिपळचोप, मिक्का, भरड इत्यादी गावांमधून विखुरले. पिपळचोप मधील सत्याग्रही घरात पाणी शिरले. गावकरी स्त्री-पुरुष, कार्यकर्ते कमरेपर्यंतच्या पाण्यात उभे होते. पुन्हा एकदा पोलिसांनी सर्वांना अटक केली व जबरदस्तीने पकडून झोपडीत नेले. दरम्यान, डोमखेडीच्या सत्याग्रही झोपडीतही पाणी शिरले होते. तेथील २४ प्रमुख गावकरी व कार्यकर्ते तर २४ तासाहून अधिक काळ पाण्यात होते. धडगांवहून सुटल्यानंतर सर्व सत्याग्रही डोमखेडीला जाऊन वाढत्या पाण्यात पुन्हा उभे राहिले.

२१ सप्टेंबर १९९९ - २० सप्टेंबरच्या रात्रीपासून डोमखेडीच्या सत्याग्रही झोपडीत पाणी पुन्हा वाढू लागले. शेकडो गावकरी रात्रभर कंबर-छाती इतक्या पाण्यात होते. २१ तारखेच्या दुपारी १२ वाजता तर समर्पण दलाच्या कार्यकर्त्यांच्या मेधाताई, देवराम भाई, सीताराम भाई इत्यादिंच्या हनुवटी पर्यंत, ओठापर्यंत पाणी आले होते. कोणत्याही क्षणी समर्पणाची

शक्यता होती. याचवेळी पिपळचोच, सिक्का, भरड, जलसिंधी इथल्या सत्याग्रही झोपड्यांमध्येही पाणी शिरले. तेथेही शेकडो गावरी स्त्रीपुरुष, आपापल्या मुलाबाळांना घेऊन, कमरेइतक्या पाण्यात, जराही विचलित न होता उभे होते. घोषणा देत होते. दुपारी पोलिसांनी पाण्यात येऊन, डोमखेडीची झोपडी तोडून समर्पण दल व इतर सर्व सत्याग्रहींना अटक केली.

डोमखेडी, जलसिंधी व इतर गावातील बुडिताविरुद्धच्या सत्याग्रहींचा हा निर्धार नर्मदा आंदोलनाच्या आजवरच्या संघर्षाची परिणती आहे. डूबेंगे पर नहीं हटेंगे हा निर्धार सत्याग्रहींनी खरा केला. अहिंसक सत्याग्रहाचा हा एक उत्कर्षबिंदू होय.

३१ डिसेंबर ला नर्मदा खोऱ्यातील आदीवासी व भारतातील विविध भागातील कार्यकर्ते एकत्र आले व एकोणिसाव्या शतकाची सागतां व विसाव्या शतकाची सुरुवात साजरी केली. विविध भागांमध्ये 'निर्माण' व 'पर्याय' मध्ये काम करणाऱ्या लोकांनी एकत्र येऊन परस्परांच्या कामाचा परिचय करून घेतला.

२००० -

११ जानेवारी २००० ला महेश्वर धरणावर पुन्हा सुमारे ३००० लोकांनी धरणे दिले. धरणाचे काम थांबवले. मध्यप्रदेश सरकारची दडपशाही सुरूच. आंदोलन सुरूच.

मार्च २००० मध्ये निभाड मध्ये महिला मेळावा व युवकांची सायकल प्रचार मोहीम राबवण्यात आली.

मार्च ते में २००० मध्ये सर्वोच्च न्यायालयातील याचिकेची अंतिम सुनावणी ९ में रोजी समाप्त झाली. सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र व मध्यप्रदेशामध्ये तक्रार निवारण प्राधिकरण स्थापन करण्याचा अंतरीम आदेश दिला. त्यानुसार न्या. सोहनी (म. प्र.) व न्या. कुर्डुकर (महाराष्ट्र) या निवृत्त न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली प्राधिकरण गठीत करण्यात आले.

२५ एप्रिल ते ५ मे मध्ये महाराष्ट्राच्या शेकडो विस्थापितांचे नंदुरबारला

धरणे, पुनर्वसनासाठी जमिनी उपलब्ध असल्याचा दावा सरकारने सिद्ध करुन दाखवावा या मागणीसाठी धरणे दिले. मेधाताई, वेस्ता भाऊ, पाणक्या कारभारी सहित पांचजणाचे बेमुदत उपोषण. जिल्हाधिकाऱ्याला काहीही लिहून देऊ नका असे सरकारी आदेश. सर्वांना अटक.

मार्च ते जून मध्ये गुजरातेत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली त्याचा फायदा घेऊन सरदार सरोवराचे घोडे दामटण्याचा गुजरात सरकारचा प्रयत्न मात्र वृत्तपत्रे व माध्यम, तज्ञांनी विकेंद्रीत पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पांचाच पुरस्कार केल्यामुळे तो प्रयत्न असफल ठरला.

१४ मे २००० ला निभाड मध्ये 'जन आंदोलनाच्या राष्ट्रीय समन्वयाचे' तिसरे महा अधिवेशन. बडवानीमध्ये १४ मे रोजी मोठ्या धरणांविरोधी मोठा मोर्चा.

१५ जुलै २००० ला नर्मदा सत्याग्रह - २००० सुरू. अॅडमिरल (निवृत्त) रामदास यांच्या हस्ते उद्घाटन. 'निर्माण' व 'पर्याय' क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी पेडल पंपद्वारे गावांत वीज तयार करून दिवे लावले.

६ मे २००० ला जागतिक शांतता दिवस. नर्मदा बचाव आंदोलनातर्फे प्रकल्पग्रस्त लोकांच्या मुलांसाठी जी जीवनशाळा चालविण्यात येते त्या जीवनशाळेच्या मुलांनी शांतता व समृद्धीसाठी आवाहन केले. पावरी या आदिवासी भाषेतील कथांचे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले.

९ ऑगस्ट २००० ला सत्याग्रह स्थळी हुतात्मा दिवस साजरा करण्यात आला.

१५ ऑगस्ट २००० ला स्वातंत्र्यदिनी डोमखेडीत लघु-जल ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन ज्येष्ठ सर्वोदयी नेते सिद्धराज ढड्ढा यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या प्रकल्पामुळे दहा घरांच्या कुटियाणी पाड्याला वीज, रस्त्यांचे विद्युतीकरण, एकदंर ३०० वॅट्सच्या या प्रकल्पाची उभारणी गांवकरी, कार्यकर्ते यांनी केली. त्याला खर्च १५००० रु.

## ह्याचे मत

## नर्मदा योजनेमधून सौराष्ट्राच्या शेतीला नगण्य पाणी

नर्मदा (सरदार सरोवर प्रकल्प)च गुजरातचा उद्धार करू शकेल असे अनेक शेतकरी समजतात. गुजरातचे कृषि संचालक आय्.जी.पटेल तर असे म्हणतात की नर्मदा योजना जितक्या लवकर पूर्ण होईल तितक्या लवकर शेतीचा विकास होईल. केंद्रीय नियोजन आयोगाचे सल्लागार व शेती विशेषज्ञ डॉ. एस्.एन्. जोशी मात्र या अभिप्रायाशी सहमत नाहीत. ते म्हणतात की नर्मदेमधून कच्छ-सौराष्ट्रामधील अतिशय कमी शेतीला पाणी मिळेल. म्हणून येथील शेतीचा विकास करावयाचा झाल्यास त्यासाठी पावसाच्या पाण्याची योग्य रीतीने साठवण आणि त्याचे व्यवस्थापनच करावे लागेल. त्यासाठी भूगर्भजलाची पातळी वाढवण्याचे प्रयत्न करावे लागतील. त्याचप्रमाणे माती खणून काढण्याचे प्रमाण कमी करावे लागेल.

डॉ. जोशी म्हणतात, "सरकार नर्मदा योजनेवर जेवढा खर्च करीत आहे त्याच्या २० टक्के खर्च जरी पाणी साठवण्यावर केला तरी धान्याच्या उत्पादनात अनेक पटींनी वाढ होईल.

डॉ. जोशींची अशी सूचना आहे की विहिरीतून भरमसाठ पाण्याचा उपसा करणाऱ्या शेतकऱ्यांवर निर्बंध घालण्याची गरज आहे. त्यासाठी विजेचे दर हॉर्सपॉवरच्या ऐवजी पाण्याच्या वापरावर अवलंबून असावेत. पाण्याचा भरमसाठ वापर थांबला तर भूगर्भाची पातळी वाढेल. आता तर नर्मदा योजनेशी संबंधित बाबींची सुनावणी सर्वोच्च न्यायालयामध्ये होत आहे. गेल्या चार महिन्यांपासून धरणाचे कामही थांबले आहे. सरकारी योजनेनुसार याच (१९९५) वर्षीच्या उन्हाळ्यात भडोच आणि बडोदा या गावांमध्ये नर्मदेचे पाणी पोहोचायला हवे होते, जे आता अशक्य आहे." डॉ. जोशींचे विचार वस्तुस्थितीच्या अधिक जवळ आहेत.

इंडिया टुडे (गुजराती) ६-२० मे १९९५च्या अंकातील गुजरातच्या विकासातील विशेष विभागामधील शेतीविषयीच्या लेखामधून. (पृ. ५०)

## पाण्याचे पर्याय शोधा

भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी)
गुजरात शाखा

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (मार्क्सवादी) गुजरात शाखेची चौदावी राज्य परिषद १६-१७ नोव्हेंबर १९९१ ला अलाहाबाद येथील दिनकर मेहता नगरात संपन्न झाली. यामध्ये राज्याच्या स्थितीवर चर्चा झाली. या सम्मेलनाचा वृत्तांत पक्षाच्या 'पीपल्स डेमॉक्रसी' या मुखपत्राच्या दि. १ डिसेंबर १९९१ च्या अंकात प्रकाशित झाला. राज्याच्या स्थितीवरील चर्चेच्या या वृत्तांतात म्हटले होते,

"राज्याच्या समितीने दिलेल्या वृत्तांत व जाहीरनाम्यावरून राज्याची सामाजिक-आर्थिक व राजकीय वस्तुस्थिती स्पष्ट होत आहे..... नर्मदा योजनेला गुजरातची जीवनरेखा म्हणून संबोधले जात आहे. नर्मदा प्रकल्पामुळे पिण्याच्या व शेतीच्या पाण्याच्या आवश्यकता पूर्ण होतील या दाव्याला नाकारणारा ठराव या परिषदेत संमत करण्यात आला. पाण्याची खरी गरज असलेल्या कच्छ-सौराष्ट्र प्रदेशाला या प्रकल्पामधून पाणी मिळणार नाही. असेही त्या ठरावात नमूद करण्यात आले होते. वारंवार पडणारा दुष्काळ, पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि परिणामतः लोकांचे स्थलांतर होऊन ते देशोधडीला लागणे हीच स्थिती कायम आहे. म्हणून ही परिषद राज्य शासनाकडे, पाण्याच्या पर्यायांचा शोध घेण्याची मागणी करीत आहे."

(पीपल्स डेमॉक्रसी, दिल्ली १.१२.९१)

## सगळ्यांनाच माहीत आहे....

दक्षेश परीख

इंडिया टुडे गुजराती (६-२० मे १९९५) मधील गुजरात विकासावरील विशेष विभागात ज्येष्ठ वित्तीय पत्रकार दक्षेश परीख यांचा, राज्याच्या

औद्योगिक विकासावरील लेख प्रकाशित झाला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, गुजरातमध्ये नवीन अर्थव्यवस्थेत ३१ मार्च १९९५ पर्यंत रु. ६८०९१ कोटीचे भांडवल गुंतवणारे २७३७ प्रस्ताव आले होते. राज्यात सध्या रु.८१२८१ कोटीच्या २१३६ योजना अंमलात आणल्या जात आहेत. गुजरातमध्ये सध्या १० कंपन्यांचे रु. ४६२०८ कोटीचे उद्योग सुरू होत आहेत. यांच्यामध्ये रिलायन्स (रु. १८६०६ कोटी) एस्सार (१००७५ कोटी) आय.पी.सी.एल. (३८३३ कोटी) जी.एस.सी.एल. (३१२० कोटी) आदित्य बिर्ला (२६०१ कोटी) अरविंद (२४१० कोटी) निरमा (२२७५ कोटी) मॉडर्न (१२५३ कोटी) कोअर (१०३५ कोटी) जी.एस.एफ्.सी. (१००० कोटी) यांचा समावेश आहे.

वेगवेगळ्या उद्योगांमधील सर्वाधिक गुंतवणूक रसायने व पेट्रोकेमिकल्स (रु. २६०४० कोटी) रिफायनरी (११८८४ कोटी) खाणी (४७६४ कोटी) वीज (२४०० कोटी) इंजिनिअरिंग (४६३४ कोटी) या उद्योगांमध्ये करण्याचे प्रस्तावित केले आहे. हे उद्योग पाण्याचा वापर, प्रदूषण, विस्थापन वाढवणारे आहेत.

याच लेखात पाण्यावर चर्चा करताना श्री पारीख म्हणतात, ''नर्मदा योजनेला पाण्याच्या सगळ्या समस्या दूर करणारी योजना म्हटले जाते. मात्र सौराष्ट्र आणि कच्छला त्या योजनेचा मामुली फायदा होणार हे सगळ्यांनाच माहीत आहे.

(इंडिया टुडे, गुजराती ६-२० मे, १९९५)

## साखर कारखाने - कच्छ व सौराष्ट्राचे काय ?

जगदीश शाह, *संपादक, भूमिपुत्र बडोदा (१ जुलै १९९३)*

''साखरेचे कारखाने उभे राहत आहेत. त्यासाठी यंत्र साहित्य मागवले जात आहे. आता तर हे सर्व नर्मदा प्रकल्पाचे अभ्यासक व पूर्वीचे वित्तमंत्री श्री सनत मेहता यांना सांगून सवरून व त्यांच्या प्रेरणेनेच केले जात आहे. राज्याचे मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांचे मूळ गाव असलेल्या संखेडा

तहसिलीमध्ये साखर कारखाना उभा करण्याकरिता तेथे शेतकऱ्यांची सहकारी संस्था स्थापन करण्याची तयारी चालू आहे. कुठे शेतकऱ्यांची आगेकूच सुरू आहे तर कुठे राजकारणी नेते त्यामध्ये अडसर घालत आहेत.

मेधा पाटकर ज्याला विरोध करीत आहे त्याचा पुरावा न देण्याचा प्रयत्न आहे. ही वस्तुस्थिती जाणून घेण्याचा लोकांनी प्रयत्न करावा.

संखेड्यापासून तर आमोद-वागरा पर्यंतच्या प्रदेशात दुसरा कोणताच जलसिंचन प्रकल्प नाही. त्यातून आमोद-वागरा येथील प्रदेशातील जमीन ही जास्त पाणी धरून ठेवणारी नाही. फक्त २५-३० वर्षांच्या तात्कालिक फायद्यासाठी शेतकऱ्यांना ज्यामुळे कायमची जमीन गमवावी लागेल अशी ही उसाची शेती करण्यासाठी सरकार मदत तरी कशाला करते ? त्यावर नियंत्रण का ठेवत नाही ?

नर्मदेच्या कालव्यामधून २१ इंच प्रति हेक्टर पाणी मिळत असताना ७.५ प्रति हेक्टर पाण्याची आवश्यकता असलेला ऊस पिकवायचा तरी कशाच्या भरवशावर ? सुरत-वलसाड जिल्ह्यांमध्ये साखरेचे कारखाने वाढतायत ते कालव्यांमधून येणाऱ्या स्वस्त आणि भरपूर पाण्यामुळे. विहिरी, तलाव किंवा नलिकाकूप यांच्यासारखे पाण्याचे महागडे स्रोत तिथे नाहीत.

नर्मदा प्रकल्पाच्या पाण्याचे वाटप कम्प्युटर द्वारे होणे ही गोष्ट तर साखर कारखानदारांची लॉबी चालवूनच घेणार नाही. शेवटी कम्प्युटर चालवणारा तरी माणूसच आहे ना ? आणि भडोच-बडोदा या जिल्ह्यांनी राजकीय दबाव आणून जास्त पाणी घेतले तर कच्छ-सौराष्ट्राच्या प्रदेशापर्यंत पाणी पोहोचण्याची गोष्ट ही आकाशात दिवसाढवळ्या चांदण्या दाखवण्यासारखी अशक्य कोटीतील गोष्ट होऊन बसेल.

अब्जावधी रूपये खर्च करून तयार होणाऱ्या नर्मदा प्रकल्पाचे फायदे भडोच-बडोद्याला फार पार तर अहमदाबाद-गांधीनगर पर्यंतच्या प्रदेशालाच मिळणार असतील तर गुजरातमधील अन्य लहानमोठ्या सिंचन प्रकल्पांचे काम वर्षानुवर्षे थांबवून सगळी सरकारी साधने फक्त नर्मदा प्रकल्पामध्येच घालवून टाकणे हा अन्याय नाही तर काय ? गुजरातचे मुख्यमंत्री, नर्मदा

प्राधिकरणाचे अध्यक्ष हे सर्वजण काय या बाबतीत अनभिज्ञ आहेत ?

राजकारणी पुढाऱ्यांवर आता विश्वास राहिलेला नाही. त्यांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे वेगळे आहेत. याच कारणामुळे कच्छ-सौराष्ट्रामध्ये मेधा पाटकरांच्या मतांची दखल घेतली जाऊ लागली आहे. सरकार व राजकारणी पुढारी यात्रा काढून किंवा गुंडांकडून दंगली माजवून मेधाताईंचा आवाज बंद पाडण्याच्या प्रयत्नात आहेत परंतु त्याऐवजी त्यातील सत्याचा स्वीकार करून व पूर्ण सावधगिरी बाळगून नर्मदा प्रकल्प पुढे रेटणे आवश्यक आहे.

('भूमिपुत्र' या बडोद्यांच्या सर्वोदयी साप्ताहिक पत्रिकेचे संपादक जगदीश शहा हे सरदार सरोवर प्रकल्पाचे समर्थक आहेत.)

## नर्मदा प्रकल्पाने हर्षभरित होण्याचे काही कारण नाही.

केशुभाई

श्री केशुभाई पटेल हे १९९५-९६ मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री होते. आता ते पुन्हा एकदा मुख्यमंत्री झाले आहेत. यापूर्वी ते विरोधी पक्षनेते तसेच १९९० मध्ये नर्मदा विकास मंत्रीही होते. नर्मदा प्रकल्पाचे ते कट्टर समर्थक मानले जातात.

वर्ष १९९१ मध्ये धोराजी येथील आमदारांच्या कार्यालयाचे उद्घाटन करताना ते म्हणाले, "नर्मदा प्रकल्पामुळे सौराष्ट्राने हर्षभरित होण्याचे काहीही कारण नाही. कारण त्याचे पाणी सौराष्ट्रातील काही क्षेत्रांपर्यंतच पोहोचू शकेल. मात्र (लहान) धरणांचे फायदे संपूर्ण प्रदेशाला मिळू शकतील. म्हणून लहान धरणे बांधल्यानेच सौराष्ट्राचा विकास होणार आहे.

(संदेश - बडोदा)



Aalochana

# सरदार सरोवर झाल्यावरही गुजरातचा ८०% भूभाग कोरडाच राहणार

- जयनारायण व्यास

सिद्धपूर (मेहसाणा) येथील आमदार जयनारायण व्यास यांचा उत्तर गुजरातेतील पाणी समस्येचा सखोल अभ्यास आहे. विधानसभेच्या बाहेरही ते लेख, टिप्पण्या इत्यादींद्वारे आपले म्हणणे मांडत असतात. पाण्याच्या समस्येवर त्यांनी चर्चासत्रेही आयोजित केली आहेत. १९९५ मधील भाजपाच्या सुरेश मेहता मंत्रीमंडळामध्ये ते नर्मदेचे विकासमंत्री झाले होते. नर्मदा धरणाचे ते आता हिरीरीने समर्थन करतात. परंतु टाइम्स ऑफ इंडिया (गुजराती) अहमदाबाद च्या १७ जुलै १९९० रोजीच्या अंकात एका मुलाखतीमध्ये ते म्हणतात,

''उत्तर गुजरातला त्रस्त करणारा प्रश्न आहे तो पाण्याचा. नर्मदा प्रकल्प पूर्णतः कार्यान्वित झाल्यावरही उत्तर गुजरातेतील ८० टक्के प्रदेश या फायद्यापासून वंचित राहणार आहे. ज्या ८० टक्के प्रदेशाला त्याचा फायदा होणार नाही त्या प्रदेशाचा विचार कुणी करणार आहे की नाही ? त्याची चिंता कुणाला आहे की नाही ? या क्षेत्रालाही त्याचा फायदा व्हावा म्हणून एका स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना करून स्वतंत्र योजना ताबडतोब अंमलात आणली पाहिजे.''

''उत्तर गुजरातेतील जलग्रहण क्षेत्रांचा विकास, लहान बंधारे, तलावांमधील गाळ उपसून ते आणखी खोल करणे इत्यादी प्रकारांनी पाण्याची साठवण करता येईल. त्याचप्रमाणे धरोई धरणाचे पाणी उत्तर गुजरातला मिळावे किंवा कडाणा येथील हाय लेव्हल कालवा पुन्हा सुरू करणे हे उपाय आहेत. पाटण, सिधपूर, महेसाणा, विजापूर येथील भूगर्भजलाचा पातळी दर वर्षी खाली जात आहे. एका सर्वेक्षणानुसार भूगर्भजलाच्या पातळीत दर वर्षी ३ मीटर ने घट होते आहे. १९८१ मध्ये पाणी ३३.४५ मीटर खाली होते. आता (१९९० मध्ये) ते ५५.७८ मीटर खाली गेले आहे.

(टाइम्स ऑफ इंडिया (गुजराती) अहमदाबाद १७ जुलै १९९०)

## आता असे म्हणावे लागत आहे.....

अनिल पटेल, *आर्च-वाहिनी*

(आर्च वाहिनी नावाची गुजरातची एक स्वयंसेवी संस्था १९८५ पासून गुजरातच्या १९ गावांच्या पुनर्वसनालाच पुरेसे मानत होती. त्याच्या आधारावर संस्थेने नर्मदा बचाव आंदोलनाच्या विरोधात मोहीम काढली व मणिबेली आणि इतर गावांच्या विस्थापनात सरकारी मदतीने दडपशाहीलाही मदत केली. परंतु आजपर्यंतची पुनर्वसनाची स्थिती पाहून या संस्थेने आपल्या भूमिकेचा पुनर्विचार सुरू केल्याचे दिसते आहे.)

"...... सर्व प्रभावित आदिवासींचे योग्य पुनर्वसन होण्याच्या अटीवरच आम्ही धरणाचे समर्थन केले होते. परंतु मध्य प्रदेशातील शेकडो विस्थापितांना फसवून खराब जमीन दिली गेली, शेकडो लोक अजून मूलभूत सुविधांपासूनही वंचित आहेत. त्यामुळे आम्हाला आता 'कोई नहीं हटेगा। बाँध नहीं बनेगा' ही भूमिका घेणे भाग पडत आहे. आर्च वाहिनीने आता अशी भूमिका घेतली आहे की सरदार सरोवरासारखा प्रकल्प म्हणजे काही एकतर्फी खेळ नाही. "पुनर्वसन नाही तर धरण नाही." हेच धोरण योग्य आहे.

(टाइम्स ऑफ इंडिया, अहमदाबाद २२.१२.९५)

## सौराष्ट्राला विशेष फायदा नाही

मनुभाई कोटाडिया

मनुभाई कोटाडिया हे गुजरातमधील अमरेली येथील खासदार व व्ही.पी. सिंग सरकारमध्ये (१९९०) केंद्रीय जलसंसाधन विकास राज्यमंत्री होते.

अहमदाबाद : गुजरात नर्मदा व्हॅली फर्टिलायजर कंपनी लिमिटेडचे अध्यक्ष व माजी केंद्रीय जलसंसाधन मंत्री मनुभाई कोटाडिया यांनी मंगळवारी असे म्हटले आहे की सौराष्ट्राच्या फक्त दहा टक्के प्रदेशाला नर्मदा प्रकल्पाचा फायदा मिळणार आहे. म्हणून सरकारने सौराष्ट्रातील लहान पाटबंधारे प्रकल्प हाती घ्यावेत. मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांना लिहिलेल्या एका पत्रात श्री

कोटाडिया यांनी असे म्हटले आहे की सौराष्ट्रात फक्त लहान पाटबंधारे योजनाच टिकाव धरून राहू शकतात. परंतु सध्या सर्व पाटबंधारे योजना ठप्प करून त्यांचे पैसे नर्मदा प्रकल्पाकडे वळविले जात आहेत. हा प्रकार असाच चालू राहिला तर सौराष्ट्राची सहनशक्ती संपुष्टात येईल.

(इंडियन एक्स्प्रेस, बडोदा १३.८.९३)

## नर्मदा प्रकल्पाचा फक्त १% पैसा.....

जयनारायण व्यास

अहमदाबाद-उत्तर गुजरातमधील विंधण विहिरींची खोली ८५०-९०० फुटांपर्यंत पोहोचली आहे. पंधरा वीस हजार वर्षांपूर्वीच्या पाण्याचा साठा बाहेर खेचणे सुरू आहे. या प्रदेशाच्या भूगर्भजलाच्या ७५ टक्के पाणी संपून गेले आहे. उत्तर गुजरातमधील शेतकरी देशभरातील सगळ्यात महागडे पाणी वापरत आहे. उत्तर गुजरातेतील मेहसाणा, बनासकांठा व सांबरकांठा हे जिल्हे झपाट्याने उजाड होत आहेत. सामूहिक विनाशाकडे त्यांची वाटचाल सुरू आहे. भारतीय जनता दलाचे आमदार जयनारायण व्यास यांनी या प्रदेशाचा अभ्यास करून तयार केलेल्या अहवालात वरील बाब नमूद केलेली आहे.

श्री व्यास यांनी असे म्हटले आहे की, नर्मदा प्रकल्प अंमलात आल्यानंतरही उत्तर गुजरातमधील भूगर्भजल संपल्यामुळे तेथील गावेच्या गावे उजाड होण्याची आपत्ती आहे. लहान प्रमाणावरील जलसिंचन आणि जल व्यवस्थापन प्रकल्प आवर्जून अंमलात आणले नाहीत तर शेती व पशुपालनावर अवलंबून असलेली लोकवस्ती येत्या दहा वर्षांतच देशोधडीला लागेल. दहा हजार कोटींच्या नर्मदा प्रकल्पामधील फक्त एक टक्का पैसा जरी पाण्याच्या आणि जमिनीच्या व्यवस्थापनावर खर्च केला तरी हे जनजीवन वाचवता येईल. उत्तर गुजरातसाठी हा जीवन मरणाचा प्रश्न आहे. राजकारणाचा नाही."

(फायनान्शियल एक्स्प्रेस, गुजरात, अहमदाबाद २१.८.९३)

## सरदार सरोवरामुळे लहान पाटबंधारे प्रकल्प बुडणार

सरदार सरोवर प्रकल्पाचा खर्च जसजसा वाढत चालला आहे. तसतसे कच्छ, सौराष्ट्र व उत्तर गुजरात यांमधील दुष्काळग्रस्त प्रदेशातील पाण्याचे प्रकल्प एकतर रद्द केले जात आहेत किंवा त्यांचा पैसा सरदार सरोवराकडे वळविला जात आहे. सरदार सरोवरावरील खर्च सरकारच्या म्हणण्यानुसार जरी फक्त ९००० कोटी रुपये इतका असला तरी प्रत्यक्षात तो १२००० ते १३००० कोटी रुपये इतका अंदाजित करण्यात आला आहे. याशिवाय फक्त १००० कोटी रुपयांचे या प्रदेशातील अंदाजे शंभर प्रकल्प येत्या पाच वर्षांत पूर्ण होऊ शकणार आहेत. राज्याच्या वर्ष १९९१-९२ च्या अर्थसंकल्पामध्ये नर्मदेच्या लाभक्षेत्रापासून वंचित राहणाऱ्या प्रदेशाच्या पाटबंधारे सुविधांसाठी ९१ कोटी रुपयांची तरतूद केलेली होती. त्याउलट यावर्षी (१९९३ मध्ये) नर्मदा प्रकल्पाचा त्या वर्षीचा खर्च ५८२.१५ कोटी रुपये अंदाजित करण्यात आला होता, ज्यामध्ये २२३ कोटी रुपये इतर राज्यांकडून अपेक्षित होते.

राज्याच्या पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार सौराष्ट्रात ८६ लहान पाटबंधारे प्रकल्प तयार होण्याची शक्यता आहे. यापैकी २२ जामनगर, २० जुनागढ, २१ भावनगर, ३ अमरेली व ८ सुरेंद्रनगर जिल्ह्यांत होणार आहेत. आर्थिक टंचाईमुळे चालू योजनाही पुष्कळ रेंगाळत आहेत.

.....सौराष्ट्रातील या प्रकल्पांची मूळ गुंतवणूक ८.३५ कोटी रूपये होती. जी आता ५०० कोटी रुपये झाली आहे. गुजरातच्या पाटबंधारे विभागाच्या अर्थसंकल्पामधील ५० कोटी रुपये दर वर्षी सौराष्ट्राला मिळतात. या पद्धतीने तर ती कामे एका दशकातही पूर्ण होणार नाहीत. वर्ष १९८२-८३ मध्ये, सौराष्ट्राची ३१०८ हेक्टर्स जमीन मध्यम व लहान पाटबंधाऱ्यासाठी आणण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रत्यक्षात १९९० पर्यंत सरकारी आकड्यांनुसार फक्त ६१६ हेक्टर्स जमीन अशा रीतीने ओलिताखाली आणली गेली. उत्तर गुजरातच्या आदिवासी प्रदेशांमध्ये भूगर्भजलाची पातळी खूप खाली गेली आहे. सरकारी अंदाजानुसार येथे १३९ लहान बंधारे ६२० रिचार्ज विहिरी,

१५१ पाझर तलाव, १६२ भूगर्भातील लहान बंधारे व २०० इंजेक्शन विहिरींची आवश्यकता आहे. त्याचबरोबर भूसंधारण आणि जलग्रहण क्षेत्रांचाही विकास होणे आवश्यक आहे. या सर्वांसाठी रु. १०० कोटीची आवश्यकता आहे. शासनाचा प्राथम्यक्रम न बदलल्यास राज्यातील पाण्याचे वितरण हे खूपच एकांगी होईल अशी भीती जाणकार सूत्रांनी व्यक्त केली आहे. जागतिक बँकेने मदत केली तरीही सरदार सरोवराचा खर्च इतका वाढेल की येणाऱ्या वर्षांमध्ये धरणाच्या इष्टतेवरच प्रश्नचिन्ह लागेल अशीही भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

(इकॉनॉमिक टाइम्स, अहमदाबाद ४.१.९३)

## गुजरात विधानसभेमधील चर्चा

"विधानसभा अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी काँग्रेस आयू चे सदस्य वीरजीभाई ठुमरे यांनी असे सांगितले की आठव्या पंचवार्षिक योजनेमधील जलसिंचनाच्या कामासाठी मंजूर केलेल्या रकमेच्या ८५ टक्के रक्कम सरकारने नर्मदा प्रकल्पासाठी दिलेली आहे. नर्मदा प्रकल्पाकडे सरकारचे संपूर्ण लक्ष आहे. परंतु सौराष्ट्रामधील लहान व मध्यम जलसिंचन प्रकल्पांवर त्या प्रमाणात आयोजन करून पैसे खर्च केले जात नाहीत असे सौराष्ट्रातील जनतेचे मत आहे. सौराष्ट्राला सापत्न भावाने वागवले जाऊ नये या वीरजीभाईंच्या विनंतीशी भाजपाचे जयनारायण व्यासही सहमत झाले आणि त्यांनी असे सांगितले की उत्तर गुजरातच्या जनतेमध्येही हीच भावना आहे. आकडेवारीचा आधार देऊन त्यांनी सांगितले की गुजरातमध्ये कमी पर्जन्यवृष्टीच्या काळातही १०५० लाख एकर फूट पाऊस पडतो. त्यातील फक्त ८ टक्के म्हणजे ८० लाख एकर फूट पाणी साठवून ठेवले जाते. साठवण केलेल्या पाण्याचे प्रमाण २०० लाख एकर फुटापर्यंत वाढले तर सरदार सरोवर जलाशयाच्या दुप्पट पाणी उपलब्ध होईल.

गुजरात समाचार, बडोदा २१.८.९३

## "कच्छ आता अन्याय सहन करणार नाही"
## नर्मदा रॅलीची घोषणा

भूज ता. १६ - नर्मदेच्या पाणी वाटपामध्ये गुजरातच्या सीमेवरील व दुष्काळग्रस्त कच्छ जिल्ह्यावर केल्या गेलेल्या अन्यायाकडे सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी तसेच या सीमावर्ती प्रदेशातील किमान १३.९५ लाख एकर जमीन ओलिताखाली आणण्यासाठी पाण्याचा हिस्सा मिळाला पाहिजे इ. मागण्यांसाठी कच्छ जलसंकट निवारण समितीच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या लोकयात्रेला आज अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. संपूर्ण कच्छमध्ये बंद पाळला गेला. हजारो लोक लोकयात्रेत सहभागी झाले. नर्मदेच्या पाण्यातील न्यायपूर्ण हिस्सा मिळाला नाही तर नर्मदेच्या बॉडस्‌मध्ये गुंवणूक न करण्याचा संकल्पही लोकांनी केला. कच्छ जलसंकट निवारण समितीद्वारा मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात चार मागण्यांचा समावेश होता, त्या अशा :

१) कच्छमधील किमान १३.९५ लाख एकर जमीन ओलिताखाली आणण्यासाठी नर्मदा धरणामधील पाण्याचा हिस्सा

२) पिण्याच्या पाण्यासाठी किमान व्यासाची का? वेगळी पाइप लाइन ?

३) पावसाचे पाणी अडवण्यासाठी व जिरवण्यासाठी कच्छच्या प्रत्येक गावात तलाव आणि लहान बंधारे इत्यादी कामे पूर्ण करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये पैशांची तरतूद

४) कच्छला सिंधु नदीच्या पाण्याऐवजी राजस्थानच्या कालव्यामधून पाणी देण्याच्या योजनेची अंमलबजावणी.

(कच्छ मित्र १६ ऑगस्ट १९९३, भूज)

# अधांतरी लटकलेली

श्री भरतसिंह चुडासमा, *गांधी शांति प्रतिष्ठान केंद्र, अहमदाबाद*

"१९८७ मध्ये सुरू झालेला आणि वर्ष २००० मध्ये पूर्ण होण्याचा दावा करणारा नर्मदा प्रकल्प आज डिसेंबर १९९५ मध्येही अधांतरीच लटकलेला दिसत आहे. प्रकल्पाचे समर्थक असलेल्या गुजरातच्या अग्रगण्य राजकीय पक्षांनी, कट्टर कार्यकर्त्यांनी आणि प्रतिष्ठित मान्यवरांनी अनाकलनीय असे मौन धारण केले आहे.....

रु. ६४०० कोटींनी पूर्ण होणाऱ्या या प्रकल्पाचा खर्च रु. १३,००० कोटींवरून वाढून आता रु. २०,००० कोटींपर्यंत पोहोचला आहे. (श्री जयनारायण व्यास, अध्यक्ष, नर्मदा निगम २१.९.९५) गेल्या ८ वर्षांमध्ये एकाही वर्षात या प्रकल्पावर रु. १००० कोटीपेक्षा अधिक खर्च होऊ शकला नाही. अशा परिस्थितीत येणाऱ्या ५ वर्षांत दरवर्षी रु. ३००० कोटी कसे व कुठून आणणार हे जनतेच्या समोर आणणे आवश्यक आहे. नर्मदा प्रकल्पाच्या विरोधकांनी एवढा आवाज उठवला नसता तर विस्थापन किंवा पुनर्वसन यांच्या बाबतीत एवढी जागृतीही झाली नसती. या सगळ्या समस्यांवरील उपायांचा विचारही होत नाही. आता त्यावर १३,५०० कोटी रुपयांची आहुती दिल्यानंतर आज २५ वर्षांनंतरही, नर्मदेचे पाणी कुठपर्यंत पोहोचेल या प्रश्नाचे उत्तर तर मिळतच नाही. अशीच २५ वर्षे उलटून गेली. १९९३ मध्ये जो प्रकल्प पूर्ण होणार होता तो आता २००६ मध्ये तरी पूर्ण होतो का या प्रश्नाचे उत्तरही आज कोणाकडेही नाही...."

(भूमिपुत्र, बडोदा १.१.९६)

## नर्मदा बचाव आंदोलन

बी-१३, शिवम् फ्लॅट, एलोरा पार्क रोड, बडोदा-३९०००७

फोन : ०२६५-३८२२३२, फॅक्स : द्वारा ०२६५-३३०४३०

प्रति : एन.बी.ए. : ३८२२३२

इ-मेल : NBA@LWBDQ.LWBBS.NET

इ-मेल : medhapatkar@vsnl.com

इ-मेल : baroda@narmada.org

- ६२, म. गांधी मार्ग, बडवानी, जि. खरगोन, म.प्र. ४५१५५१

  फोन : ०७२९०-२२४६४ फॅक्स : द्वारा ०७२९०-२२७८६


  प्रति : एन.बी.ए.: २२४६४

संपर्क :

| | | |
|---|---|---|
| मुंबई | : | परवीन जहांगीर, फोन : २१८४७७९, |
| | | इ-मेल : jeha52@bom2.vsnl.net.in |
| | | संजय मंगो, फोन : ५३६९७२४ |
| पुणे | : | संजय संघवी, फोन : ५४५०८७० |
| | | इ-मेल : sanjay@narmada.org |
| | | सुनीती सु. र., फोन : ०२०-५३२८०४ |
| | | इ-मेल : vinaysuniti@rediffmail.com |
| | | साधना दधीच, फोन : ०२०-३५६७६३ |
| दिल्ली | : | दिल्ली फोरम, फोन : ६४२६७८३, |
| | | इ-मेल : delforum@vsnl.com |
| | | विमल, फोन : २२५६३९४, २२५०६३२ |
| | | इ-मेल : napmdel@vsnl.com |
| होशंगाबाद | : | योगेश दीवान, फोन : ०७५७४-५२४८७ |
| | | सुशील राजेश, फोन : ०७५७४-५३७६५ |

# नर्मदा खोऱ्यातील प्रस्तावित तीस मोठ्या धरणांचा नकाशा

## स्थळ व लाभक्षेत्र





टीप - १ सरदार सरोवर, २४ इंदिरा सागर, २६ महेश्वर, २७ वेदा, २८ मान, २९ गोई, ३० जोबट, - प्रकल्पांचे काम सुरु आहे
८ मटियारी, ९ बरगी, १७ बारना, १८ तवा, १९ कोलार, २२ सुक्ता - पूर्ण झालेले प्रकल्प

नर्मदा की पहचान २४.०८.२०००

## सरदार सरोवरामुळे गुजरातला होणाऱ्या लाभक्षेत्राचा नकाशा

प्रकल्प स्थळ : नवागाम, ता. नांडोड, जि. भरूच (गुजरात)

लाभक्षेत्र -१७.९२ लाख हेक्टर




| | | |
|---|---|---|
| टीप : | धरणाची उंची | – ४६० फूट |
| | धरणाची लांबी | – २१४ किमी |
| | बुडीत क्षेत्र | – ३७ हजार हेक्टर |
| | बुडीत गावे | – २४५ |
| | बुडीत क्षेत्रामुळे बाधित कुटुंबे | – ४१ हजार (सरकारतर्फे) |

*कालवे, वसाहती (सरकारी), वनीकरण आणि बुडीत क्षेत्र ह्या सर्वांमुळे जवळजवळ ८ लाख लोक विस्थापित होत आहेत.*

## *AALOCHANA*

Centre For Documentation And Research
86/11 B,Kedar, Kanchan Galli, Erandwana,
PUNE - 4.

Note : Book to be lent for a period of 1 month.
Fine for Rs.4/- per week after due date of return

| Date of return | Date of return |
|---|---|

## विशेष

विकासनीती विषयक आस्था असलेले चिंतक, अभ्यासक, विश्लेषक, समीक्षक यांना उपयुक्त असे सरदार सरोवर धरणावरचे माहितीरूपाने पुस्तक उपलब्ध.

नर्मदा खोऱ्यातील सर्वात मोठे सरदार सरोवर प्रकल्प (SSP) ह्या धरणामुळे होणारे विस्थापन, लाभ-हानी पर्यावरण व विकासनीती ह्या मुद्यांना घेऊन १९८६ साली सुरू झालेली लोक चळवळ-नर्मदा बचाओ आंदोलन. ह्या आंदोलनाची गेल्या १५ वर्षाच्या वाटचालीची विस्तृत ाहिती, दावे, सत्यस्थिती, लाभ हानीची आकडेवारी उपलब्ध करून देणारे पुस्तक इंग्रजी भाषेत उपलब्ध झाले आहे.

पुस्तकाचे लेखक संजय संघवई मूळ व्यवसायाने पत्रकार पण गेली दहा वर्ष पूर्ण वेळ नर्मदा बचाओ आंदोलनाचा कार्यकर्ता म्हणून कार्यरत.

पुस्तकाचे नाव - **The River and Life**

प्रकाशक - अर्थ केअर बुक्स
२ आनंद, १७ करमायकल रोड,
आनंद-कमल महाल सोसायटी, मुंबई - ४०००२६
फोन नं. ४९६४८२५

ई-मेल - earth@bom5.vsnl.net.in

१० मिडलटन स्ट्रीट, कलकत्ता - ७०००७१
फोन नं. २२९६५५१

ई-मेल - earthcarebooks@vsnl.com

पुस्तकाचा आकार - १४ X २२ से.मी. (१/८ डेमी) पेपरबॅक

पृष्ठसंख्या - २२०

किंमत - १५० रू.